पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ७५ ● रविवार, दि. २०सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com







# शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणार: कृषीमंत्री

## विभागातील 56 तालुक्यांत परिस्थिती गंभीर; अमरावती विभागाच्या आढावा बैठकीत विविध मुद्यांवर खडाजंगी

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला** : अमरावती विभागातील तीव्र पीक परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्यांचा आढावा घेण्यासाठी अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या डॉ. आर. के. ठाकरे सभागृहात रविवारी एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या उच्चस्तरीय बैठकीत शेतकरी प्रश्नांसह चुकीच्या बातम्यांचा सुळसुळाट, महावितरणचा कारभार आणि सिंचनाचा वीजपुरवठा या मुद्द्यांवरून वातावरण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळाले. विभागातील ५६ तालुक्यांत स्थिती गंभीर असून शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचे काम सरकार करेल, अशी ग्वाही कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी दिली, मात्र बैठकीत कोणतीही ठोस घोषणा झाली नाही.

बैठकीदरम्यान काही माध्यमे आणि सोशल मीडियावर आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दुष्काळ जाहीर केल्याची खोटी बातमी प्रसारित झाल्याचा मुद्दा गांभीर्याने उपस्थित करण्यात आला. या दिशाभूल करणाऱ्या वृत्तामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण होत असल्याचे सांगत, अशा अफवा पसरविणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी याची त्वरित दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.पीक परिस्थिती, शेतकऱ्यांचे अवाजवी नुकसान आणि सिंचनासाठी आवश्यक असणारा सुरळीत वीजपुरवठा या सर्व मुद्द्यांमुळे अकोल्यातील ही आढावा बैठक शेतकरी प्रश्नांवर चांगलीच गाजली.





कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अकोला पालकमंत्री आकाश फुंडकर, मंत्री संजय राठोड, आदिवासी मंत्री अशोक उईके, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खा. अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार संजय खोडके, आ.सुलभा खोडके, आ.रवी राणा आदींची उपस्थिती होती.

### आ. रणधीर सावरकरांची सर्वसमावेशक भूमिका

आमदार रणधीर सावरकर यांनी पश्चिम विदर्भाच्या विकासासाठी प्रशासनाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. निर्णय घेताना केवळ एका जिल्ह्यापुरता विचार न करता 'इंटिग्रेटेड अप्रोच' (सर्वसमावेशक दृष्टिकोन) ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. पश्चिम विदर्भातील सर्व मंत्र्यांची एक 'हाय पॉवर कमिटी' (उच्चाधिकार समिती) तयार करण्यात यावी, ज्यामध्ये सर्व संबंधित खात्यांचा सहभाग असेल तरच कामे जलद गतिने होतील. तसेच रब्बी पेरणीच्या पूर्वसंध्येला २५ टक्के अनुदानाचे धोरण ताबडतोब जाहीर करावे, जेणेकरून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

### आमदार हरीश पिंपळे यांचा संताप

बैठकीत आमदार हरीश पिंपळे यांनी शेतकऱ्यांच्या तारांची चोरी, खंडित वीजपुरवठा आणि सौरऊर्जा प्रकल्पांमधील अनास्थेवरून महावितरण आणि प्रशासनाला धारेवर धरले. मतदारसंघात विजेच्या तारा चोरण्याचे प्रमाण वाढले असून किलोमीटरच्या किलोमीटर तार चोरीला जात आहेत. मानोरा व मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार देऊनही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. ४२ ते ४५ दिवसांचा पावसाचा खंड पडल्यामुळे सोयाबीनचे संपूर्ण पीक वाया गेले असून विनापंचनामे नुकसान झाले आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्याला तात्काळ 'दुष्काळग्रस्त' घोषित करावे, तसेच सौरऊर्जेचे अर्ज करून दोन वर्षे लोटूनही न देणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

### दोषींवर कायदेशीर कारवाई – कृषिमंत्री भरणे

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या संशोधन संचालकांसह काही व्यक्तींविरोधात लाखो रुपयांच्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्याचा मुद्दा कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासमोर उपस्थित करण्यात आला. गुन्हा दाखल होऊनही विद्यापीठ प्रशासनाकडून संबंधितांवर प्रशासकीय कारवाई का करण्यात आली नाही, असा सवाल यावेळी करण्यात आला. याबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना प्रश्न विचारला असता, या प्रकरणातील दोषींची कठोर चौकशी करण्यात येईल आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी प्रसारमाध्यमांना दिली. त्यामुळे कृषी विद्यापीठातील कथित भ्रष्टाचारप्रकरणी आता चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची भूमिका सरकारकडून घेण्यात येणार असल्याचे कृषिमंत्र्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले.

## »थोडक्यात

### भारतीय महिला नेमबाजांचा रौप्य पदकावर निशाणा!

**नागोया** : जपानमधील नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय महिला नेमबाजांनी दमदार कामगिरी केली. भारताच्या इलावेनिल वलारिवन, सोनम म्हस्कर आणि विनोद विदर्सा या त्रिकुटाने १० मीटर एअर रायफल महिला सांघिक प्रकारात चमकदार कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. या स्पर्धेत तिन्ही भारतीय नेमबाजांनी सुरुवातीपासूनच अचूक निशाणा साधत उत्कृष्ट समन्वय दाखवला. त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताच्या पदकांचे खाते उघडले असून, क्रीडा जगतातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### महाराष्ट्राची कन्या स्वीडनमध्ये खासदार

**मुंबई** : राज्यातील शिक्षणतज्ज्ञ अशोक विखे पाटील यांच्या कन्या नीला विखे पाटील या स्वीडनमध्ये खासदार बनल्या आहेत. १३ सप्टेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत स्टॉकहोम शहर मतदारसंघातून ४१ वर्षीय नीला विखे पाटील यांनी विजय मिळवला.नीला विखे पाटील या आशियातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पणती, माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांची नात आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुतणी आहेत. विजयानंतर 'स्वीडनच्या ३४९ सदस्यांच्या संसदेत सहभागी होताना आनंद होत आहे. स्टॉकहोम शहर आणि देशासाठी योगदान देण्यास आपण उत्सुक आहे', अशी भावना नीला यांनी व्यक्त केली.

### ममतांचे सर्वोच्च न्यायालयात आव्हान

**नवी दिल्ली** : तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह गोठवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेत ममतांनी निवडणूक आयोग तसेच प. बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते रितब्रत बॅनर्जी यांना प्रतिवादी केले आहे. नंदीग्राम आणि रेजीनगर येथे ६ ऑक्टोबरला विधानसभा पोटनिवडणुका होत असून निवडणूक आयोगाने ममतांच्या गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे चिन्ह दिले आहे.

# शेतकरी पुत्र आणि आंदोलक अटकेत !

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला** : कोरडा दूष्काळ, पिकांची दयनीय अवस्था आणि अपेक्षित भाव न मिळाल्यामुळे संकटात सापडलेल्या बळीराजाचा रोष अखेर चव्हाट्यावर आला आहे. अकोला जिल्ह्यात दौऱ्यावर आलेल्या कृषिमंत्र्यांना प्रतिकात्मक स्वरूपात सोयाबीनचे झाड देण्यासाठी गेलेल्या आझाद फाउंडेशन आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना एमआयडीसी पोलिसांनी अटकेची कारवाई केली आहे. या धडक आंदोलनामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे अकोला जिल्ह्यातील सोयाबीनचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. हीच व्यथा शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी आंदोलक रस्त्यावर उतरले होते. जिल्ह्यात तात्काळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करावा, या प्रमुख मागणीसाठी त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. कृषिमंत्र्यांसमोर हजेरी लावून शेतकऱ्यांची नेमकी दुर्दशा दर्शवणारे सोयाबीनचे झाड सुपूर्द करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

मात्र, सुरक्षा व्यवस्थेचे कारण देत गोपाल पोहरे, विष्णू अरबट, रवी गावंडे यांच्यासह ३ ते ४ आंदोलक शेतकरी पुत्रांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या दडपशाहीमुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप उसळला असून, शासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे

# मुंबईच्या कोस्टल रोडवर भरधाव कारने चौघांना उडवले!

## तीन जणांचा मृत्यू, एकाची प्रकृती चिंताजनक

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मुंबई** : मुंबईत सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. वीकेंडच्या रात्री लोक सार्वजनिक गणेश मंडळांचे देखावे आणि आरास पाहण्यासाठी निघतात. त्यामुळे मुंबईच्या रस्त्यांवर रात्रभर रेलचेल असते. याचदरम्यान, मुंबईतील कोस्टल रोडवरून एक वाईट बातमी आली आहे. रविवारी सकाळी मुंबई कोस्टल रोडवर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका बीएमडब्ल्यू कारचा अपघात झाला. हा अपघात पहाटे ५:२०च्या सुमारास लोटस जेट्टीजवळ घडला. यात तिघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी अपघाताचा तपास सुरू केला असून प्राथमिक माहितीनुसार, अतिवेग हे अपघाताचे कारण असल्याचे दिसून येते. अपघातानंतर कारच्या चालकाला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे.

मरीन ड्राईव्हकडून हाजी अलीच्या दिशेने जात असताना लोटस जेट्टीजवळ कोस्टल रोडवर भरधाव वेगाने जाणाऱ्या बीएमडब्ल्यू कारचा अपघात होऊन तीन जणांचा मृत्यू झाला आणि एक जण गंभीर जखमी झाला. नायर रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत झालेल्या दोघांची ओळख शनाय गज्जल (२१) आणि धीर्या सेठ (१७) अशी पटली आहे, तर एका २५ वर्षीय अज्ञात पुरुषालाही मृत घोषित करण्यात आले; २० वर्षीय अज्ञात पुरुष ट्रॉमा वॉर्डमध्ये गंभीर अवस्थेत आहे, अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### विजेच्या धक्क्याने दोघांचा मृत्यू!

लालबागमधील काळाचौकी येथील प्रसिद्ध महागणपतीच्या मंडपाजवळ रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास विजेचा जोरदार धक्का लागल्याने एका ८ वर्षांच्या बालिकेसह २ गणेशभक्तांचा मृत्यू झाला. तर तीन जण जखमी झाले. रविवारी मध्यरात्री २.२० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी काळाचौकी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली.

# एमपीएससीच्या अध्यक्षपदी तुकाराम मुंढेंची नियुक्ती करा!

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एमपीएससीच्या पेपरफुटीवरून विद्यार्थ्यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. आमदार रोहित पवार यांनी दुसऱ्यांदा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे समोर येत आहे. त्यानंतर रोहित पवारांनी एमपीएससीच्या विरोधात पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात २६ सप्टेंबर रोजी पुण्यात मोर्चा काढण्यात येणार आहे.

एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांची अध्यक्षपदावरून हकालपट्टी करण्यात यावी ही मागणी या आंदोलनात प्रामुख्याने असणार आहे. एमपीएससीने तत्काळ सर्व रिक्तपदांवर भरती करून घेण्यात यावी, ही मागणी आंदोलनात असणार आहे. मागच्या वेळी रोहित पवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. तसेच मुख्यमंत्र्यांनी भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली होती. परंतु या प्रकरणात कोणतीही कारवाई न झाल्याने रोहित पवारांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.



### रोहित पवारांच्या नेतृत्वात पुण्यात मोर्चा धडकणार!

# भारताच्या 'क्वीन'ने जग जिंकले!

## अशी कामगिरी करणारी जगातील एकमेव फलंदाज

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मुंबई** : एशियन गेम्समध्ये महिलांमधील दुसरा सेमी फायनल सामना भारत आणि बांगलादेशमध्ये सुरू आहे. या सामन्यामध्ये भारतीय संघ पहिल्यांदा फलंदाजी करण्यासाठी उतरला आहे. या सामन्यामध्ये भारताची स्टार खेळाडू स्मृती मानधना हिने इतिहास रचला आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्मृतीने नावावर केला आहे. स्मृतीने पुरुष आणि महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा केल्या असून अशी कामगिरी करणारी ती जगातील एकमेव खेळाडू ठरलीय. महाराष्ट्राच्या सांगलीमधील असणाऱ्या स्मृतीने आपल्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे. बांगलादेशविरूद्ध आजच्या सामन्यामध्ये फलंदाजीला उतरल्यावर स्मृतीने पहिल्यापासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. अवघ्या १९ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. यामध्ये तिने २ षटकार आणि ५ चौकार लगावले आहेत. स्मृतीने न्यूझीलंडच्या सुझी बेट्सला मागे टाकत हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. बेट्सने १७८ डावांमध्ये ४,७५८ धावा केल्या होत्या. स्मृतीने १७८ सामने खेळताना १७१ डावांमध्ये ४७८८ धावा केल्या असून यामध्ये दोन शतके आणि ३६ अर्धशतकांचा समावेश आहे. ती भारतासाठी या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक १०० षटकार मारणारी फलंदाज आहे. २०२६ आशिया कप मध्ये तिने मिताली राजला मागे टाकत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी भारतीय महिला फलंदाज होण्याचा मान मिळवला होता.




### रोहित शर्मा, विराट कोहलीला टाकले मागे!

भारताचे स्टार खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना याआधीच तिने मागे टाकले आहे. भारतीय पुरूष क्रिकेटर्समध्ये टी-२० प्रकारात सर्वाधिक ४२३१ धावांचा विक्रम रोहित शर्माच्या नावावर आहे. त्याच्यापाठोपाठ दुसऱ्या स्थानावर ४१८८ धावांसह विराट कोहली आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम पाकिस्तानचा खेळाडू बाबर आझम (४५९६ धावा) याच्या नावावर आहे. स्मृती ५००० धावांचा टप्पा पूर्ण करण्यापासून २४२ धावा दूर आहे. लवकरच स्मृती हा विक्रमही आपल्या नावावर करेल.



# चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

**अकोला** : अमरावती विभागाच्या पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या डॉ. आर. के. ठाकरे सभागृहात एक महत्त्वाची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत एक गंभीर मुद्दा ऐरणीवर आला, ज्यामध्ये काही वृत्तवाहिन्यांवर आणि सोशल मीडियावर आदिवासी मंत्र्यांनी दुष्काळ जाहीर केल्याची खोटी व दिशाभूल करणारी वृत्तबातमी दाखवण्यात आल्याचे समोर आले. या चुकीच्या माहितीमुळे शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. या प्रकाराबद्दल सभागृहात तीव्र संताप व्यक्त करत, अशा प्रकारच्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवणाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, अशी आक्रमक मागणी आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी केली.

या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही मागणी मंजूर केली.

तसेच, अफवा पसरवून समाजात संभ्रम निर्माण करणाऱ्या संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी अकोल्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले. या बैठकीनंतर घेण्यात आलेल्या अधिकृत पत्रकार परिषदेत या निर्देशनांची पुनरावृत्ती करत प्रशासनाकडून अफवाबाजांवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



# यूपीआयवरील 'डिजिटल कर': सवयीचे जाळे आणि सर्वसामान्यांची लूट!

भारतात यूपीआय द्वारे पेमेंट करणे २०१५-२०१६ पासून सुरुवात झाली खरी, परंतु कोरोनाच्या काळात अचानक सोशल डिस्टेंसिंगचे पालन करण्यासाठी सुरू झालेला 'यूपीआय' (UPI) चा वापर आज प्रत्येक भारतीयाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. भाजीच्या ठेल्यापासून ते मोठमोठ्या मॉल्सपर्यंत, ५ रुपयांच्या कटिंग चहापासून ते हजारोंच्या खरेदीपर्यंत डिजिटल पेमेंटची 'स्कॅन आणि पे' ही पद्धत अतिशय सहज आणि मोफत पर्याय म्हणून जनतेने स्वीकारली. परंतु, आता याच मोफत सुविधेवर ₹२००० च्या वर पेमेंट केल्यास चार्जेस (शुल्क) आकारले जाणार असल्याच्या चर्चांमुळे सर्वसामान्य नागरिक चक्रावून गेला आहेत.




आधी सवय लावा, मग खिसा कापा! ही काही पहिलीच वेळ नाही. कारपोरेट जगतातील आणि प्रशासकीय धोरणांमधील ही रणनीती आता उघडी पडली आहे. रिलायन्स जिओचेच उदाहरण घ्या—सुरुवातीला मोफत डेटा आणि अमर्याद कॉलिंग देऊन देशवासीयांना डिजिटल विश्वाची सवय लावण्यात आली. एकदा का जनता या सुविधेच्या आहारी गेली, की मग टप्प्याटप्प्याने दरात भरमसाट वाढ करण्यात आली. आज यूपीआयबाबतही तेच धोरण राबवले जात आहे की काय, असा रास्त संशय जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. आधी मोफत सुविधेचा अमिश दाखवून सवय लावायची आणि नंतर त्याच सेवेवर 'डिजिटल दंड' लादायचा, हा एक प्रकारे सर्वसामान्यांच्या खिशावर मारलेला दरोडाच आहे.

जीएसटीचा दुहेरी मारा आणि प्रशासकीय अनास्थे मुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाला आहे. नागरिक जेव्हा कोणतीही वस्तू किंवा सेवा खरेदी करतो, तेव्हा त्यावर आधीच केंद्र आणि राज्य सरकारचा भरमसाट 'जीएसटी' (GST) भरत असतो. व्यापाऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर करवसुली आधीच होत आहे. अशा स्थितीत, आपल्याच कष्टाच्या पैशांचे डिजिटल हस्तांतरण करण्यासाठी पुन्हा अतिरिक्त पैसे मोजावे लागत असतील, तर हा थेट आर्थिक छळ आहे. जर प्रशासनाला डिजिटल देवाणघेवाणीवर कर किंवा शुल्क वसूल करायचेच असेल, तर यूपीआयद्वारे पेमेंट करणाऱ्या ग्राहकांना मूळ वस्तूवरील 'जीएसटी' मध्ये सूट का दिली जात नाही? नेमका प्रशासनाचा खरा हेतू काय?सदर युपीआय वर कर आकाराचा फायदा व्यापारी किंवा ॲप कंपन्यांपेक्षा थेट प्रशासनाच्या किंवा यंत्रणेच्या तिजोरीत जात असल्याचे चित्र समोर येत आहे. रोख व्यवहारांना आळा घालून 'डिजिटल इंडिया'चे स्वप्न दाखवणाऱ्या प्रशासनाने आता स्वतःच डिजिटल व्यवहारांवर कराचा बोजा टाकून नागरिकांना पुन्हा रोख व्यवहारांकडे ढकलण्याचे काम सुरू केले आहे का?

अतिप्रमाणात कर लादून आधीच महागाईने होरपळलेल्या मध्यमवर्ग आणि कष्टकऱ्यांचा आर्थिक, मानसिक व शारीरिक छळ करणे थांबवले पाहिजे. मोफत सुविधेच्या नावाखाली जनतेला जाळ्यात ओढून नंतर त्यांची आर्थिक कोंडी करणारा हा 'खेळ' तातडीने थांबणे गरजेचे आहे, अन्यथा 'डिजिटल क्रांती, शोषणाची उत्क्रांती' असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
मो. ९८२२६७४४८७

# गणपती Special...अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध

## मूलांक 5 – नशीबाची साथ... आणि बदलण्याची ताकद!

कल्पना करा...एका हॉलमध्ये शेकडो लोक बसले आहेत. प्रत्येकाची जन्मतारीख वेगळी, प्रत्येकाची कहाणी वेगळी... आणि त्यात काही जण असे, ज्यांचा जन्म ५, १४ किंवा २३ तारखेला झाला आहे.

अंकशास्त्रात त्यांचा मूलांक ५ मानला जातो. अंकशास्त्राच्या परंपरेत ५ हा बुधाचा अंक मानला जातो—बुद्धी, संवाद, चपळ विचार, creativity आणि adaptability यांच्याशी त्याचा संबंध जोडला जातो.




**मूलांक ५ — एक विशेष Boon**

मूलांक ५ असणाऱ्यांची एक मोठी ताकद म्हणजे—परिस्थिती बदलली की स्वतःला बदलण्याची क्षमता.

एक मार्ग बंद झाला? दुसरा मार्ग शोधूया!

एक संधी गेली? नवीन संधी निर्माण करूया!

यांचं मन एका जागी फार काळ थांबत नाही. नवीन कल्पना, नवीन लोक, नवीन अनुभव आणि नवीन प्रयोग यांच्याकडे त्यांचा ओढा असू शकतो. नशीबाची साथ मिळाली तर त्याचा फायदा उठवण्याची चपळाईही त्यांच्यात असते.

**BOONS — मूलांक ५ ची वरदानं**

चपळ बुद्धी — गोष्टी पटकन समजून घेण्याची क्षमता Communication — बोलून लोकांपर्यंत पोहोचण्याची ताकद

• Adaptability — परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची क्षमता

• Creativity — नवीन कल्पना आणि वेगळा दृष्टिकोन

• Networking — नवीन लोकांशी सहज connect होण्याची शक्यता • साहस — नवीन अनुभव घेण्याची तयारी • संधी ओळखण्याची क्षमता — योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची ताकद

थोडक्यात — डोकं वेगवान, विचार वेगळे आणि पाऊल पुढे टाकण्याची तयारी.

CURSES — याच गुणांची दुसरी बाजू. प्रत्येक वरदानाची एक सावली असते...

जास्त विचार overthinking

जास्त पर्याय confusion

जास्त freedom discipline कमी होण्याची शक्यता. नवीन गोष्टींची आवड एखादं काम पूर्ण होण्याआधी दुसऱ्या कामाकडे वळण्याची शक्यता कधी कधी—सुरुवात जबरदस्त... पण सातत्य कमी! मन म्हणतं—“हे करून पाहूया...” मग दुसरी कल्पना येते—“नाही, हे करूया!” आणि तिसरी कल्पना तर तयारच असते! म्हणून मूलांक ५ साठी एक गोष्ट खूप महत्त्वाची—

Freedom + Discipline = खरी ताकद

Career & Money

Business, marketing, sales, media, teaching, writing, public speaking, travel, networking, technology आणि creative fields यांसारख्या क्षेत्रांमध्ये communication आणि adaptability उपयोगी पडू शकतात. पण पैसा कमावण्याइतकंच पैसा टिकवणं आणि नियोजन करणं महत्त्वाचं.

मूलांक ५ ने स्वतःला हा प्रश्न अधूनमधून विचारावा—

“मला काय हवंय?” पेक्षा “मला नेमकं कुठे पोहोचायचं आहे?” Lifestyle मूलांक ५ ची Lifestyle म्हणजे— नवीन लोक... नवीन जागा... नवीन अनुभव... नवीन कल्पना! एकच routine रोज? कधी कधी कंटाळा येऊ शकतो. पण variety च्या शोधात stability हरवू नये. स्वातंत्र्य सुंदर आहे...पण दिशेविना स्वातंत्र्य गोंधळ निर्माण करू शकतं.

**मनाची गोष्ट...**

बाहेरून हसतमुख, energetic आणि confident दिसणाऱ्या व्यक्तीच्या मनातही अनेक प्रश्न असतात. कधी थकवा...कधी अपेक्षा...कधी एकटेपणा... “हर मुस्कुराता चेहरा खुश हो, ये ज़रूरी तो नहीं... कुछ लोग दर्द को भी मुस्कुराकर जीना जानते हैं।” म्हणून मूलांक ५ ला फक्त त्याच्या चपळपणातून समजू नका...त्याच्या शांत क्षणांनाही समजून घ्या.

**शेवटी एक गोष्ट...**

मूलांक ५ नशीबवान मानला जातो...पण नशीब म्हणजे समस्या नसणं नाही. नशीब म्हणजे कधी कधी अडचणीतून बाहेर पडण्याची बुद्धी, संधी ओळखण्याची नजर आणि पडल्यावर पुन्हा उभं राहण्याची क्षमता.

“किस्मत दरवाज़ा खोल सकती है, लेकिन उस दरवाज़े से आगे बढ़ना आपके कदमों का काम है।” मूलांक ५ ची खरी ताकद — नशीबापेक्षा परिस्थिती बदलण्याची क्षमता!

**महत्त्वाची सूचना**

फक्त मूलांक ५ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व किंवा भविष्य ठरवता येत नाही. पूर्ण जन्मतारीख, इतर अंक, ५ ची पुनरावृत्ती आणि संपूर्ण अंकांची रचना यांचाही विचार केला जातो.

**अंक फक्त संख्या नाहीत...**

प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते. तुमचा मूलांक ५ आहे का? तुमच्यातील कोणतं Boon आणि कोणतं Curse तुम्हाला सर्वात जास्त जाणवतं? Comment मध्ये सांगा.




सीमा बक्षी
अकोला
मो. नं. 9834571153


# सेवा संकल्प अभियान : जनमनाचे समाधान

राज्य शासनाचा प्रत्येक विभाग १७ सप्टेंबरपासून "सेवा संकल्प अभियान" या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. "सेवा संकल्प अभियान" विषयी ही माहिती. देशाचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात ‘सेवा परमो धर्मः’ या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच निमित्ताने महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभराच्या कालावधीत राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान म्हणजे कार्यक्रमांची फक्त रेलचेल नसून, शासकीय सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ आणि दारापाशी नेण्याचा हा जोरकस प्रयत्न आहे.




‘सेवा परमो धर्मः’ ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. राज्यातले प्रशासन १७ सप्टेंबरपासून "सेवा संकल्प अभियान" या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

**लोकाभिमूख प्रशासनाची कास**

गावातील सामान्य नागरिकाला प्रमाणपत्र हवे असेल, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असेल किंवा एखाद्या गरीब कुटुंबाला शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल, अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये फे-या माराव्या लागु शकतात. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. महसुली विभागामार्फत प्रत्येक तालुक्यात ‘सेवा सेतू’ शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांमुळे कामे गतीमान**

‘सेवा सेतू’शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा जनतेला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या सेवा संकल्प अभियानातून होणार आहे.

**गावातच सेवा आणि समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार ‘सेवा माझे योगदान’ उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासन, सेवा आणि समाजविकास**

शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. त्याचे महत्त्व प्रत्येकाच्या आयुष्यात खुप जास्त आहे.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण जनतेची दैनंदिन गरजांची पूर्तता या अभियानात प्रामुख्याने केली जात आहे.

**अंगणवाडीत मुख्य उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. ‘अंगणवाडी उत्सव’ अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याच्या उपक्रमाचा समावेश या अभियानात करण्यात आला आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता माता, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**नव्या कल्पनांना व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी ‘इनोव्हेशन चॅलेंज’ आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विभागीय माहिती कार्यालय,**
**अमरावती**

# गणेशोत्सवाची धूम

गणेशोत्सव हा भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील सर्वात मोठा, उत्साही आणि लाडका सण आहे. भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला लाडक्या गणपती बाप्पाचे घराघरांत आणि मोठ्या सार्वजनिक मंडपांमध्ये अत्यंत थाटामाटात आगमन होते.

या उत्सवाच्या काळात संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि जल्लोषपूर्ण बनून जाते. रोषणाई, फुलांची सजावट, ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष आणि आरतीच्या स्वरांनी परिसर दुमदुमून जातो. बाप्पाला आवडणारे उकडीचे मोदक आणि विविध प्रकारच्या पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिरे आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात, ज्यामुळे समाजात एकता आणि बंधुभाव वाढीस लागतो. दहा दिवसांच्या या आनंदोत्सवानंतर अनंत चतुर्दशीला जड अंतःकरणाने आणि 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात बाप्पाला निरोप दिला जातो. हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवा उत्साह, आनंद आणि सकारात्मकता घेऊन येतो.



# दलित साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणारे साहित्यिक दया पवार!

दगडू मारुती पवार उर्फ दया पवार हे मराठी साहित्यिक होते. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १९३५ रोजी अहमदनगरमधील धामणगाव येथे झाला. संगमनेरच्या बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण केले. १९५६ मध्ये मुंबईतील पशुवैद्यक महाविद्यालयात त्यांनी लेखनिक व प्रयोगशाळा सहायक म्हणून नोकरीस सुरुवात केली. १९६७ मध्ये अस्मितादर्शमध्ये त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. दलित साहित्य चळवळीच्या कार्यात १९६८पासून त्यांचा सक्रिय सहभाग होता.

१९६९ मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेच्या प्रतिष्ठान मुखपत्रात त्यांचा दलित साहित्यावर लिहिलेला लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाला. श्रीलंकेत कोलंबोमध्ये १९७५ला भरलेल्या जागतिक बुद्ध परिषदेलाही ते हजर होते. दया पवार यांनी विपुल लिखाण केले. त्यांपैकी ‘बलुतं’ हे १९७८ मध्ये प्रसिद्ध झालेले त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. दलित जीवनाची एक वेगळी ओळख त्यांनी यातून करून दिली. १९७९ मध्ये राज्य शासनाचा पुरस्कारही बलुतंला मिळाला. त्या आधी ‘कोंडवाडा’ (१९७४) या त्यांच्या काव्यसंग्रहालाही १९७५ मध्ये राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. याशिवाय ‘विटाळ’ कथासंग्रह, ‘बलुतं एक वादळ’, ‘चावडी’ स्फुटलेख, ‘पासंग’ व ‘जागल्या’ स्तंभलेखन, ‘पाणी कुठंवर आलं गं बाई’ काव्यसंग्रह, ‘कल्लपा यशवंत ढाले यांची डायरी’, ‘धम्मपद’ पाली भाषेतील धम्मपदांचा मराठी अनुवाद असे आजवर त्यांचे अनेक साहित्य प्रकाशित झाले. १९९४-९५मध्ये ते परिवर्तन साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते. भारत सरकारने दया पवार यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले आहे. अशा या थोर साहित्यिकाचे २० सप्टेंबर १९९६ रोजी निधन झाले.

ते हिंदू जातीव्यवस्थेअंतर्गत दलित किंवा अस्पृश्यांनी अनुभवलेल्या अत्याचारांशी संबंधित दलित साहित्यातील योगदानासाठी ओळखले जातात. ते धर्माने बौद्ध होते.

दया पवार यांनी त्यांचे सुरुवातीचे आयुष्य मुंबईच्या कामाठीपुरा भागाजवळील कावाखाना येथे घालवले. त्यांचे वडील गोदी मजूर म्हणून काम करत होते, तर त्यांची आई हाताने मैला साफ करण्याचे काम करत होती. आर्थिक अडचणींमुळे कुटुंबाला शहर आणि त्यांच्या गावामध्ये सतत ये-जा करावी लागत होती. वडिलांची नोकरी गेल्यानंतर, पवारांनी त्यांच्या जडणघडणीच्या काळात कठोर जातीय भेदभावाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

त्यांना त्यांच्या १९७८ च्या ‘बलुतं' या आत्मचरित्रात्मक कादंबरीमुळे प्रसिद्धी मिळाली, जी दगडू पवार यांनी अधिक सुशिक्षित दया पवार यांना सांगितलेल्या कथेच्या स्वरूपात लिहिली आहे, ज्यात दोघेही लेखकाचेच पात्र आहेत. ही कादंबरी 'शांततापूर्ण अस्तित्वासाठी संघर्ष करणाऱ्या, मानसिकरित्या छळलेल्या परंतु शब्द आणि कृतीने प्रतिकार करण्यास असमर्थ असलेल्या एका अस्पृश्याच्या अनुभवांचे' वर्णन करते. महाराष्ट्रात ती प्रकाशित झाल्यावर 'तीव्र दलितविरोधी प्रतिक्रिया' उमटली

**आज स्मृतिदिन**




होती. 'बलुतं'ने साहित्यविश्वात खळबळ उडवून दिली आणि त्यांना फोर्ड फाउंडेशनच्या पुरस्कारासह सर्व स्तरांवर अनेक पुरस्कार मिळवून दिले . त्याचे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले. साधे, सरळ आणि मुद्देसूद चित्रण, तसेच त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाचे पारदर्शक वास्तववादी चित्रण ही या पुस्तकाची बलस्थाने आहेत. या पुस्तकाने मराठी साहित्यात एक नवीन साहित्यप्रकार निर्माण केला. ' बलुतं'नंतर खडतर अनुभव आणि कठोर वास्तवांबद्दल बोलणारी अनेक आत्मचरित्रात्मक पुस्तके लिहिली गेली. पवार यांची भाषाशैली केवळ बंडखोरीची नसून, एका गहन आत्मपरीक्षण करणाऱ्या विश्लेषणात्मक विचारवंताची आहे.

पु.ल. देशपांडे यांनी 'बलुतं'ची समीक्षा केली : 'हे पुस्तक वाचल्यावर, आपल्याला सत्याची जाणीव होऊ न देणारा, अंध परंपरांचा डोळ्यांना चिकटलेला मोतीबिंदू, हे भीषण वास्तव पाहून डोळ्यांत दाटून येणाऱ्या अश्रूंमध्ये वितळून जाईल आणि आशेचे नवे किरण उजळतील. वाचक मग यापुढे आयुष्यात अधिक मानवतावादी बनण्याचा प्रयत्न करेल. सर्व उत्तम साहित्याचा उद्देश आणखी काय असतो? मानवजातीमध्ये नवीन नातेसंबंध निर्माण करणे आणि समाजाला कृत्रिम व त्रासदायक बंधनांतून मुक्त करणे, बरोबर ना? हेच पवारांच्या सर्व साहित्याबद्दलही म्हणता येईल.'

जरी त्यांना 'बलुतं'मधील आत्मचरित्रात्मक गद्यामुळे प्रसिद्धी मिळाली असली तरी , कविता ही त्यांची खासियत होती. त्यांनी आपल्या कवितेतून दलितांवरील अत्याचाराला वाचा फोडली.त्यांच्या 'कोंडवाडा' या पहिल्या कवितासंग्रहातील वरीलसारख्या प्रभावी कवितांमधून , त्यांनी पिढ्यानपिढ्या दलितांनी सोसलेल्या अत्याचारांना आणि दडपशाहीला वाचा फोडली. १९७४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'कोंडवाडा' या संग्रहाला राज्याकडून साहित्यिक पुरस्कार मिळाला.

त्यांच्या इतर प्रसिद्ध कामांमध्ये त्यांच्या लेखांचे संकलन असलेले 'चावडी' आणि 'दलित जानिवा' , आणि लघुकथा संग्रह ' विठ्ठल' यांचा समावेश आहे. त्यांनी जब्बार पटेल यांच्या 'डॉ. आंबेडकर' या चित्रपटाची पटकथा लिहिली. त्यांची राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळात नियुक्ती झाली होती.

पवार यांना भारत सरकारतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्कार मिळाला. पवार यांच्या लेखनातून राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींमधील त्यांचा सक्रिय सहभाग, विदेशी साहित्याचा त्यांचा उत्कट अभ्यास, विश्लेषणात्मक आणि चिंतनशील विचार, अढळ भूमिका, तसेच सामाजिक घडामोडी Dआणि समस्यांबद्दलची त्यांची सखोल समज आणि सहानुभूती दिसून येते. त्यांचे कार्य अत्यंत प्रभावी होते. त्यांना पुरस्कारांच्या रूपात काही प्रमाणात मान्यता मिळाली. परंतु दडपशाहीच्या परिस्थितीमुळे त्यांना वैयक्तिक आयुष्यात मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. हाच चिरस्थायी त्रास त्यांच्या लेखनातून तीव्रतेने जाणवतो. त्यांची एक कविता त्यांच्या दुःखाची जाणीव करून देते.

# सख्ख्या भावाचा खून करणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा

## अकोट सत्र न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**हिवरखेड :** सख्ख्या भावाचा खून करणारा आरोपी हरिदास गणेश मापे याला जन्मठेपेची शिक्षा अकोट सत्र न्यायालयाने सुनावली आहे. १९.०९.२०२६ रोजी अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बि. एम. पाटील यांनी पो.स्टे. हिवरखेड मधील आरोपी हरिदास गणेश मापे वय ३५ वर्ष रा. तळेगांव बु. या आरोपीने आठ दिवसापुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन भावाचा खुन केल्याच्या प्रकरणात भादवीचे कलम ३०२ कलमांअतर्गत या आरोपीस जन्मठेपेची शिक्षा व रू.५००००/- दंड सुनावला आहे.



या प्रकरणात सरकारतर्फे सरकारी वकिल अजित देशमुख यांनी एकुण १६ साक्षीदारांच्या साक्ष या प्रकरणात न्यायालयात नोंदविल्या. यापैकी फिर्यादी व ३ अल्पवयीन साक्षीदार तसेच वैद्यकीय अधिकारी व तपास अधिकारी यांच्या साक्षी या प्रकरणात महत्त्वाच्या ठरल्या.

या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दि.१५.०७.२१ रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी ही तिचे पती व मुलाबाळासह घरात जेवण करीत असतांना फिर्यादीचा दिर हरीदास मापे हा त्याचे दोन्ही हातात दोन चाकु घेवुन फिर्यादीचे घराचे बाहेर आला व आठ दिवसापुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करुन तु बाहेर निघ तुला खतम करतो. असे म्हणाला त्यावरुन फिर्यादी व तिचे पती त्याला समजावण्याकरीता घराबाहेर आले असता हरीदास मापे व त्याची पत्नी गंगा ही धावतच तिचे घराबाहेर आली व तिने फिर्यादीचे पतीला लाथ मारुन लोटले. फिर्यादी आवरायला गेली असता हरीदास मापे याने त्याचे हाताचा कोंबा मारुन फिर्यादीस दुर केले व त्याची पत्नी गंगा हिने फिर्यादीस पकडुन ठेवले व आरोपी हरीदास मापे याने फिर्यादीचे पती शिवाजी मापे यास जिवे मारण्याच्या उददेशाने त्याचे गळयावर, छातीवर बगलेत व पाठीवर त्याचे दोन्ही हातातील चाकुने सपासप वार करुन ठार केले. व फिर्यादीचे पतीला मारत असतांना आरोपी हरिदास मापे याला त्याचे हातातील चाकु त्याचे पोटाचे डावे बाजुला व त्याचे पत्नीच्या उजवे हाताच्या बोटाला लागुन त्यांना जखमा झाल्या. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन हिवरखेड पोलीस स्टेशनचे पोलीसांनी गुन्हा क. २९०/२१ भा.दं.वी. च्या ३०२,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला. या प्रकरणात तपास अधिकारी पोलीस स्टेशन हिवरखेड चे तत्कालीन ठाणेदार स.पो.नि.धिरज चव्हाण यांनी प्राथमिक तपास व तत्कालीन पो.उप. नि. विठठल वाणी यांनी प्रकरणाचा तपास करून आरोपी विरूध्द विद्यमान न्यायालयात वरील प्रमाणे दोषारोप पत्र तयार करून सादर केले, व सरकारतर्फे न्यायालयामध्ये सरकारी वकिल अजित देशमुख यांनी अंतिम युक्तिवाद केला. तसेच पोलीस अधिक्षक अकोला अर्चित चांडक अकोट पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी निखील पाटील तसेच हिवरखेड पो.स्टे.चे ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनात पैरवी अधिकारी म्हणून हिवरखेड पो.स्टे.चे ज्योती तेलगोटे यांनी सहकार्य केले. तसेच सरकारी वकील अजित देशमुख यांनी आज शिक्षेसंबधी न्यायालयात युक्तीवाद केला की, आरोपीने आपल्या सख्या भावाला ठार मारण्याचा गुन्हा केला आहे तसेच आरोपीने ३ लहान मुलांच्या डोळयासमक्ष त्यांचे वडिलांचा खुन केलेला आहे. त्यामुळे अशा आरोपीला कुठलीही दया न दाखवता त्याने केलेल्या गंभीर अपराधाबद्दल त्याला जास्तीत जास्त कठोर शिक्षा देण्यात यावी. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर कोर्टाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा रू.५१,०००/-दंडासह ठोठावली.

# सिरसोच्या पुंडलिक महाराज संस्थानच्या विकासाला 3 कोटींची प्रशासकीय मान्यता

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मुर्तिजापूर :** मुर्तिजापूर तालुक्यातील सिरसो येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत पुंडलिक महाराज संस्थानच्या सर्वांगीण विकासाला आता मोठी चालना मिळणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना (ब वर्ग) अंतर्गत संस्थान परिसरातील विविध विकासकामांसाठी तब्बल ३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या निधीसाठी आमदार हरीश पिंपळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

या निर्णयामुळे सिरसो येथील संस्थान परिसरातील मूलभूत व पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होणार असून, धार्मिक कार्यक्रम,



यात्रा व उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्य रस्ते व अंतर्गत मार्गासाठी ९९ लाख, पेव्हर्स ब्लॉक व सौंदर्यीकरणासाठी ७१ लाख, स्वयंपाकगृहासाठी ६० लाखांची तरतूद, संरक्षण भिंतीसाठी ७० लाख. १३ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार संस्थान परिसरातील विकासकामांसाठी २ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये पूर्ण झालेल्या कामांच्या देयकांसाठी १ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वितरित करण्याचा शासन निर्णय झाला होता. आता पुन्हा ३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाल्याने सिरसो संस्थानच्या विकासाला सातत्याने निधी मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### आ. पिंपळे यांच्या पाठपुराव्याचे यश

या मंजुरीबद्दल आमदार हरीश पिंपळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महायुती सरकारचे आभार व्यक्त केले आहेत. सिरसोच्या धार्मिक पर्यटनालाही चालना मिळण्याची शक्यता आहे.

# हिवरखेडमध्ये ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार वाढला

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**हिवरखेड :** हिवरखेड शहरात विविध व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये ऑनलाइन व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. मात्र, याच ऑनलाइन व्यवहारांचा गैरफायदा घेत काही व्यापारी सायबर फसवणुकीचे बळी ठरत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

व्यवसायाच्या दैनंदिन व्यवहारात ऑनलाइन पेमेंट, बँकिंग व्यवहार, लिंक, ओटीपी तसेच विविध डिजिटल माध्यमांचा वापर केला जातो. या प्रक्रियेदरम्यान अनोळखी व्यक्तींकडून संपर्क साधून अथवा विविध कारणे सांगून काही व्यापाऱ्यांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रकारातील काही व्यापाऱ्यांनी संबंधित पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, काही व्यापारी पोलिस ठाण्यात वारंवार चकरा माराव्या लागतील, वेळ जाईल किंवा आपली बदनामी होईल या भीतीने फसवणुकीची माहिती देण्यास टाळत असल्याची चर्चा आहे. तसेच यामध्ये गावातील एका मोबाईल शॉपि धारकांची मोठी ऑनलाइन फसवणूक झाली, तर एका तरुणाची बजाज चेतक शोरूमच्या माध्यमातून आय सी सी इन्शुरस कंपनी कडून फसवणूक झाली, या ऑनलाइन फसवणूक झाल्यानंतर ती लपवून न ठेवता संबंधित बँक, सायबर हेल्पलाइन आणि पोलिस यंत्रणेशी संपर्क साधणे महत्त्वाचे आहे. व्यापाऱ्यांनी अनोळखी लिंकवर क्लिक करणे, ओटीपी किंवा बँक खात्याची गोपनीय माहिती देणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# बाळापूर दधम रस्त्याची दुर्दशा, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला :** बाळापूर तालुक्यातील दधम येथील मुख्य रस्ता उखडला आहे. यामुळे नागरिकांना त्रास होतो आहे. रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी नागरिकांची मागणी आहे. ग्रामपंचायत च्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले. परंतु अद्याप दखल घेतली नाही. रस्ता दोन्ही बाजूंना उखडून गेला आहे. महिला, विद्यार्थी यांना हालअपेष्टा सोसाव्या लागत आहे.

सध्या पावसामुळे रस्ता चिखलमय झाला आहे. यावरून वाहन चालवणे अशक्य आहे. शेतकरी तसेच गावातील नागरिकांची चांगल्या रस्त्या अभावी गैरसोय होत आहे. याकडे गावकऱ्यांनी लक्ष वेधले आहे.

## सलग सुट्ट्यांमुळे शहरात गणपती पाहण्याची धूम

**अकोला :** शहरात सर्वत्र गणेशोत्सवाची धूम सुरू असून, भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

त्यातच ज्येष्ठा गौरीचे आगमन झाल्याने व सलग सुट्या असल्याने नागरिक शहरातील गणेश दर्शनासाठी घराबाहेर पडत असल्याने शहरात नागरिकांची चहलपहल मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

रात्री उशिरापर्यंत श्री दर्शनाचा आनंद नागरिक लुटत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे फेरीवाल्यांना चांगला रोजगार मिळत आहे.

एकूण शहरात सध्या चैतन्यमय वातावरण निर्माण झाले असल्याचे दिसत आहे.

# 'विद्यार्थी जीवनात मोबाईल महत्त्वाचा की पुस्तक?' न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये परिसंवाद

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला :** १५ सप्टेंबर रोजी स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूल येथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'विद्यार्थी जीवनात मोबाईल महत्त्वाचा की पुस्तक?' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. सरस मांडणी केलेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य माधव मुंशी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, कोकीळ, तसेच पर्यवेक्षिका सौ. अलका बाजरे मॅडम होत्या. परिसंवादात इयत्ता पाचवी ते आठवीतील



एकूण १२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांमध्ये आदित्य भोसले, अक्षरा खंडारे, भूमिका जुमळे, तमन्ना काजी, स्वराली वानखडे, कार्तिक चितोडे, आदर्श गवई, श्रुती भोसले, वैष्णवी मोरे, प्रांजल इंगोले, संस्कृती साबळे आणि आयुष सोनार यांचा समावेश होता.विद्यार्थ्यांनी मोबाईलचे शैक्षणिक उपयोग, त्याचे फायदे व मर्यादा तसेच पुस्तकांच्या वाचनामुळे होणारे ज्ञानवर्धन, विचारांची समृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर प्रभावीपणे आपले विचार मांडले.

या परिसंवादाचे परीक्षण सौ. सोनिया रोजतकर व गोपाल सांगूनवेडे यांनी केले. सौ. वैशाली धबाले व शशिकांत बांगर यांनी संचालन केले.

परिसंवादामध्ये कु. वैष्णवी मोरे यांनी प्रथम क्रमांक, आदित्य भोसले यांनी द्वितीय क्रमांक, तर श्रुती भोसले यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. आयोजकांच्या वतीने पारितोषिके देऊन विजेत्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून तमन्ना काजी आणि आयुष सोनार या विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली.

## श्री संत गुणवंत महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा



प्रतिनिधी २० सप्टेंबर

**हिवरखेड :** तीर्थक्षेत्र झरी बाजार येथे बहुउद्देशीय सेवाश्रम संस्थेच्या वतीने श्री संत गुणवंत महाराज यांचा १३ वा जन्मोत्सव सोहळा १९ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. जन्मोत्सवानिमित्त आयोजित यात्रा तसेच पालखी मिरवणुकीने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने श्री संत गुणवंत महाराजांचे दर्शन घेतले. जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यात्रेत भाविकांसाठी विविध धार्मिक व व्यावसायिक दुकाने थाटण्यात आली होती. परिसरातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी यात्रेला उपस्थिती लावत जन्मोत्सवाचा आनंद घेतला. श्री संत गुणवंत महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित यात्रा व धार्मिक कार्यक्रम भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने उत्साहात संपन्न झाले.

# अस्थी नदीत विसर्जित न करता शेतात पुरल्या वडिलांच्या स्मृतीत पिंपळाचे रोप लावले

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोट :** हिंदू संस्कृतीत मृत्यूनंतर अस्थींचे नदीत विसर्जन करतात. मात्र पर्यावरणाचा विचार करून आलेगाव बाजार येथील पोटदुखे परिवाराने या परंपरेला पर्यावरणपूरक पर्याय देत एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

परिवारातील अशोक आनंदराव पोटदुखे यांच्या निधनानंतर त्यांच्या अस्थी नदीमध्ये विसर्जित न करता



स्वतःच्या शेतात विधीपूर्वक पुरण्यात आल्या. त्याच ठिकाणी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पिंपळाचे रोप लावण्यात आले.

अस्थी नदीत विसर्जित केल्याने जलप्रदूषण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोटदुखे परिवाराने हा निर्णय घेतला. मृत व्यक्तीच्या स्मृती जपतानाच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, भविष्यात त्या ठिकाणी मोठे झाड वाढावे आणि त्यातून समाजाला पर्यावरण संरक्षणाचा संदेश मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे परिवाराने सांगितले.

"वडिलांच्या स्मृती कायमस्वरूपी जपण्यासाठी त्यांच्या अस्थींच्या ठिकाणी पिंपळाचे झाड लावले आहे. श्रद्धेसोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे हीदेखील आपली जबाबदारी आहे," अशी भावना पोटदुखे परिवाराने व्यक्त केली.

## लिंग गुणोत्तरात सातत्याने सुधारणा

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील लिंग गुणोत्तरात मागील काही वर्षांत सातत्याने सुधारणा होत असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येते. जिल्ह्यात २०२३ मध्ये ९१९, २०२४ मध्ये ९२२, तर २०२५-२६ मध्ये हे प्रमाण वाढून ९२८ झाले आहे. राज्याच्या २०२४ मधील ९१२ या लिंग गुणोत्तराच्या तुलनेत अकोला जिल्ह्याचे प्रमाण अधिक असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. महिला व बालकांच्या संरक्षणासाठी तसेच गर्भलिंग निवडीस प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने सोनोग्राफी केंद्रांच्या नोंदणी व देखरेखीला महत्त्व आहे. अकोला जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांच्या अधिनस्त ४० सोनोग्राफी केंद्रे तर आरोग्य वैद्यकीय अधिकारी, अकोला महानगरपालिका यांच्या अधिनस्त १५९ सोनोग्राफी केंद्रे नोंदणीकृत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य जनतेस व संबंधित सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे काळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी अकोला महानगरपालिका हद्दीतील गजानन पेठ, माहिते प्लॉट अकोला येथील इमारत मधु प्रभा रेसिडेन्सी नझुल शिट क्र 86-बी नझुल प्लॉट क्र 1/145 महसुली सर्व्हे क्र 2/4 मौजे उमरी प्रगणे, ता व जि अकोला येथील तळ मजल्यावरील दुकान क्र G-1, G-2, व G4 हे निर्मित अमोल सुत्राळे, तेजस्विनी अमोल सुत्राळे, यशराज अमोल सुत्राळे, रूपाली किशोर आंबेडकर (रा. मुंबई) यांच्या मालकीचे व प्रत्यक्षताब्यातील असलेले नोंदणीकृत मालमत्ता विकत घेण्याबाबत सौदा कायम केलेला आहे.

माझे पक्षकार हे सदर दुकान क्र G-1 चे नोंदणीकृत वरील नमूद मालक यांनी श्री. प्रकाश त्र्यंबकराव डवले (रा. प्रतीक निवास, जवाहर नगर, अकोता ता. जि. अकोला) आधार क्र. यांचेशी विक्री करण्यात खरेदी व्यवहार निश्चित केलेला आहे. तसेच दुकान क्र G-2 चे नोंदणीकृत वरील नमूद मालक यांनी मृणाली प्रकाश डवले (रा. प्रतीक निवास, जवाहर नगर, अकोता ता. जि. अकोला) आधार क्र यांचेशी विक्री करण्यात खरेदी व्यवहार निश्चित केलेला आहे व दुकान क्र G-4 चे नोंदणीकृत वरील नमूद मालक यांनी श्री. सागर सुनील लोखंडे (रा. सि-54 रोहित वेल्डिंग वर्कशॉप जवळ, खडकी बु जिल्हा परिषद नगर, अकोला जि अकोला 444004) आधार क्र यांचेशी विक्री करण्यात खरेदी व्यवहार निश्चित केलेला आहे.

सबब, सदर दुकान क्र.G-1, G-2, व G-4 वर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, बॅकेचा, वितीय संस्थेचा वारसदारांचा किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही हक्क, मालकी, गहाण बक्षीस लीन चार्ज अथवा इतर कोणताही बोजा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या आम्ही खरेदीचा व्यवहार पूर्ण करू.

माझे पक्षकार यांना कोणतीही हरकत न आल्यास, सदर मालमत्ता सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त असल्याचे मानून प्रस्तावित खरेदीदार दुकान क्र-G-1, श्री. प्रकाश त्र्यंबकराव डवले, क्र G-2 मृणाली प्रकाश डवले, व क्र G-4 श्री. सागर सुनील लोखंडे यांच्यासोबत विक्री व्यवहार पूर्ण केला जाईल. येणाऱ्या 4 दिवसांचे मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या खरेदीदारावर बंधनकारक राहणार नाहील.

ठिकाण:- अकोला
दिनांक :- 19.09.2026

**अॅड मिनल वसंतराव काळे**
R. NO. MAH/34/6/2018

# सामाजिक सलोखा आणि जनहिताचा जागर राष्ट्रतेज गणेश मंडळाची पन्नास वर्षांची परंपरा



प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी, जनजागृती आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने जुनी वस्ती येथील राष्ट्रतेज गणेश उत्सव मंडळाने गेल्या पन्नास वर्षांपासून आपली सामाजिक प्रबोधनाची परंपरा अखंड जपली आहे. यंदाही मंडळाने आकर्षक फलकांच्या माध्यमातून गुटखा-पान मसाल्यापासून दूर राहण्यासोबतच सार्वजनिक स्वच्छता आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला आहे.

'पान मसाला-गुटखा खाऊ नये, स्वतःच्या शरीराचा व सार्वजनिक मालमत्तेचा नुकसान करू नये', असा स्पष्ट संदेश देत मंडळाने गुटखा खाऊन सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यामुळे होणारे विद्रूपीकरण अधोरेखित केले आहे. रेल्वे स्थानक, भिंती, उद्याने, सार्वजनिक ठिकाणे तसेच रस्ते आणि इमारतींच्या परिसरात थुंकण्याची प्रवृत्ती टाळण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. 'स्वच्छ परिसर आपलीच जबाबदारी' हा संदेश नागरिकांच्या सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देणारा ठरत आहे.

यासोबतच मंडळाने 'वृक्ष लावा, जीवन वाचवा' या संदेशातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा, निसर्ग वाचवा, भविष्य घडवा' असा संदेश देत पुढील पिढीसाठी हिरवागार आणि निरोगी परिसर निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हरित पर्यावरण, शुद्ध हवा, स्वस्थ पृथ्वी, सुंदर समाज, जैवविविधतेचे संरक्षण आणि हवामान संतुलन यांसारख्या विषयांकडेही नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

मंडळाचे संचालक माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे, अध्यक्ष सुनील डायलकर, उपाध्यक्ष मंगेश कवटकर, सहकोषाध्यक्ष शुभम गुगळे, कोषाध्यक्ष अर्पित अग्रवाल, सचिव संकेत अग्रवाल, सहसचिव रुपेश भगत यांच्यासह अनिल शुक्ला, प्रशांत देवगिरीकर, प्रकाश महामुने, आकाश शेगोकार, प्रथम खेडकर आणि बबलू इंगळे हे मंडळाच्या सामाजिक उपक्रमांसाठी परिश्रम घेत आहेत.

## बाभुळगाव येथे विश्वकर्मा प्रगट दिन



**आलेगाव :** बाभुळगाव जांभरुन येथे विश्वकर्मा प्रगट दिन उत्सवात साजरा करण्यात आला. टाळ मृदंगा च्या गजरात गावातून दिंडीची मिरवणूक काढण्यात आली.. कार्यक्रम पार पडण्यासाठी संपूर्ण पाथरवट समाज बांधवानी जांभरून बाभुळगाव गोकुळ नागरी बाभुळगाव यांनी परिश्रम घेतले. आणि कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## जिल्ह्यात ग्रामीण रस्त्यांचा प्रश्न गंभीर

**अकोला :** जिल्ह्यात ग्रामीण भागातील रस्ते अतिशय खराब झाले आहे. त्यामुळे नागरिकांना दररोज हाल अपेष्टा सहन करणे भाग आहे. ग्रामीण रस्ते तातडीने दुरुस्त करावे अशी मागणी आहे.

## निधन वार्ता...

### तुळशीराम कोल्हे



**अडगाव बु. :** येथील तुळशीराम किसन कोल्हे यांचे 19 सप्टेंबरला वयाच्या 85 व्या वर्षी दिर्घ आजारानंतर निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी व मोठा आप्त परिवार आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## महिला शेतकऱ्यांना आता मिळणार अधिकृत ओळख

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**यवतमाळ** : राज्यातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध कल्याणकारी कार्यक्रमांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी दि. २२ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे, महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे आणि महिला शेतकऱ्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करणे यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील महिला शेतकऱ्यांना अधिकृत मान्यता देऊन त्यांना विविध शासकीय योजना, कार्यक्रम, कृषी पतकर्ज, विमा, कृषी निविष्ठा व विस्तार सेवांचा लाभ अधिक सुलभतेने मिळवून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीचे ऑनलाइन पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in/ उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# विदर्भ हाउसिंगच्या राजाला 'महालक्ष्मी'चे रूप

### 'भुतिया महल' ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू, भाविकांनी अनुभवला 'राक्षसाचा' थरार






प्रतिनिधी २० सप्टेंबर

**यवतमाळ** : शहरातील विदर्भ हाउसिंग परिसरातील बाल गणेश उत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी 'विदर्भ हाउसिंग का राजा'ची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. मंडळाचे हे १६ वे वर्ष असून, बाप्पाची 'महालक्ष्मी'च्या रुपात मनमोहक मूर्ती साकारण्यात आली आहे. तसेच त्या ठिकाणी तयार केलेले 'भुतिया महल' सध्या शहरवासीयांसह भाविकांसाठी मुख्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

बाप्पाच्या या आकर्षक मूर्तीच्या पाठीमागे फिरते चक्र असून, गणपतीच्या हातात डमरू, चक्र, लाडू, शंख, त्रिशूळ, गोल्डन हात असा देखावा निर्माण करण्यात आला आहे. मंडळाकडून दरवर्षी नवनवीन संकल्पना राबवल्या जातात; गेल्या वर्षी 'लालबागच्या राजा'ची प्रतिकृती साकारण्यात आली होती. यवतमाळचा दुर्गोत्सव हा देशभरात प्रसिद्ध असून, त्यात अनेक आकर्षक देखावे उभारले जातात. त्याच धर्तीवर बाल गणेश मंडळाने यावर्षी गणेशोत्सवात 'भुतिया गुफा'ही आगळीवेगळी संकल्पना प्रत्यक्ष उतरवली आहे.





हा उत्सव यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष आकाश जयस्वाल यांच्यासह नयन जयस्वाल, विशाल चमेडिया, अनिश भरतिया, सूरज लुक्का, यश चव्हाण, प्रेम स्वामी, राज कुशावार, ऋषभ भरुड, अमरीश भरुड, सनी सोनकर, साई मिश्रा, श्रेया जयस्वाल, निलेश नक्षणे, हार्दिक दावडा, आदित्य लांडेकर परिश्रम घेत आहे.

### देखाव्यातून नशामुक्तीचा संदेश

■ आजचा तरुण वर्ग व्यसनाधीन होत असल्याने त्यांच्यात जनजागृती करण्याचा महत्त्वाचा सामाजिक संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. गुटखा, सिगारेट, दारूबंदी व्हावी हा या मागील उद्देश होता. तसेच तरुणांनी पूर्णपणे नशामुक्त व्हावे, असे आवाहन बाल गणेश मंडळाचे अध्यक्ष आकाश जयस्वाल यांनी केले आहे.

### दहा दिवस भुतांच्या वेगवेगळ्या भूमिका

■ 'भुतिया गुफेत' सलग दहा दिवस कलाकारांच्या माध्यमातून भुतांच्या विविध भूमिका साकारल्या जात आहे. यात डॉक्टर, नन, चालती-फिरती चेटकीण चुडेल, राक्षस अशा पात्रांचा समावेश आहे. पहिल्या दिवशी 'नन चुडेल', दुसऱ्या दिवशी 'चुडेल', तर तिसऱ्या व चौथ्या दिवशी 'राक्षसाचा' थरार नागरिकांनी अनुभवला आहे. पाचव्या दिवशी डॉक्टरची मुख्य भूमिका सादर करण्यात आली असून, उरलेल्या पाच दिवसांतही नवनवीन थरारक भूमिका मांडल्या जाणार आहे.

### गौरी-गणपती उत्सवाचा दुहेरी संगम

■ १४ सप्टेंबर रोजी गणेशचतुर्थीच्या मुहूर्तावर बाप्पाची थाटामाटात प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी गौरीचे म्हणजेच महालक्ष्मी आगमन झाले आहे. गौरी व गणपती हे दोन्ही सण एकाच आठवड्यात आल्याचे औचित्य साधून मंडळाने बाप्पाच्या मूर्तीला महालक्ष्मीचे रूप दिले आहे. या दुहेरी संकल्पनेमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## सेवा संकल्प अभियानानिमित्त नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांनी साकारली फुलांची आकर्षक रांगोळी

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**यवतमाळ** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या निमित्ताने देशभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सेवा, जनसहभाग आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या हाताने फुलांच्या पाकळ्यांपासून आकर्षक रांगोळी साकारली. 'सेवा संकल्प अभियान'ची संकल्पना अधोरेखित करणाऱ्या या रांगोळीमध्ये कमळाची सुंदर प्रतिकृती साकारण्यात आली असून, त्यामध्ये 'सेवा संकल्प अभियान' असा संदेश देण्यात आला आहे. फुलांच्या विविध रंगांच्या पाकळ्यांमधून साकारलेली ही रांगोळी परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती. स्वतः रांगोळी साकारत ॲड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी लोकसहभागासोबतच प्रत्येकाने समाजासाठी आपले योगदान देण्याचा संकल्प करावा, असा संदेश या उपक्रमातून दिला. सेवा ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता दैनंदिन जीवनात सेवाभाव जपणे, समाजासाठी सकारात्मक योगदान देणे आणि लोकसहभागातून सामाजिक उपक्रमांना बळ देणे, हीच या उपक्रमामागील भावना असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. 'सेवा संकल्प अभियान'च्या निमित्ताने साकारलेली ही रांगोळी सेवा, संकल्प आणि जनसहभागाचा सुंदर संगम ठरली.

## आर्णीत किन्नर मठात रंगला महालक्ष्मीचा उत्सव

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**आर्णी** : देऊरवाडी (पुनर्वसन) परिसरात यंदा किन्नर समाजाच्या वतीने अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली. केवळ धार्मिक सोहळा न ठेवता श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीची सांगड घालत किन्नर समाजाने या उपक्रमातून समाजासमोर सामाजिक एकतेचा एक नवा आणि प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

महालक्ष्मी स्थापनेनिमित्त परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महालक्ष्मीच्यादर्शनासाठी संपूर्ण परिसरातून भाविकांनी मोठी गर्दी केली होती, ज्यामुळे देऊरवाडीचा परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.



या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'किन्नर मठ, आर्णी' येथे आयोजित करण्यात आलेला भव्य महाप्रसाद. समाजातील सर्व घटकांनी एकत्र यावे, आपुलकी आणि बंधुभाव वाढीस लागावा, या उदात्त हेतूने या महाप्रसादाचे आयोजन केले होते. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी आर्णी शहरातील विविध राजकीय पक्षांचे नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तन्नू दीदी व त्यांच्या समूहाने विशेष परिश्रम घेतले. भाविकांचे स्वागत, नियोजन आणि महाप्रसादाचे व्यवस्थापन त्यांनी अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पाडले.

## त्या घटनेच्या निषेधार्थ यवतमाळात निदर्शने

### जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन; साहिल वाकोडेच्या मृत्यूची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी




प्रतिनिधी २० सप्टेंबर

**यवतमाळ** : आयआयटी बॉम्बे, पवई येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या यवतमाळच्या विद्यार्थी साहिल रविंद्र वाकोडे यांच्या मृत्यूप्रकरणी नातेवाईकांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवेदन सादर केले आहे. एवढेच नाही तर संविधान चौकात निदर्शने करण्यात आले. परीक्षेदरम्यान घडलेल्या घटनेनंतर काही तासांतच झालेल्या मृत्यूबाबत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आयआयटी बॉम्बे परिसरात परीक्षेदरम्यान घडलेल्या घटनेनंतर काही तासांतच त्याचा मृत्यू झाला. यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. या प्रकरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी गाणी केली आहे. निवेदनावर विमल खंडूजी मुनेश्वर (आजी), ज्योती विनोद लंबे, शामलता गौतम तायडे, अर्चना पंडित वानखडे, सूर्यकांता आनंद भवरे, हर्षल कृष्णा देवस्थळे, संगीता विजय मुनेश्वर, माया अशोक मुनेश्वर, अश्विनी वासुदेव बनसोड, बबीता दिलीप कांबळे यांसह अनेक नागरिकाच्या सह्या आहे.

## अनिल खंडारे यांचे निधन

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**आर्णी** : येथील अनिल खंडारे (वय ५०) यांचे शुक्रवारी रात्री १२.३० वाजेच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत असून शोककळा पसरली आहे.

अनिल खंडारे हे 'गुड मॉर्निंग ग्रुप'चे माजी अध्यक्ष तसेच 'राष्ट्रीय चर्मकार महासंघा'चे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

शहरात त्यांचे 'कमलेश सीट कव्हर' नावाचे दुकान असून व्यवसायाच्या माध्यमातूनही त्यांचा नागरिकांशी दांडगा संपर्क



होता.

शुक्रवारी रात्री अचानक प्रकृती बिघडल्यानंतर त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे.

## गणेशोत्सव शांततेत साजरा करा, अन्यथा कारवाई

### जांबबाजार येथे शांतता समितीच्या बैठकीत ठाणेदारांचा इशारा

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**पुसद** : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गावात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जांबबाजार येथील ग्रामपंचायत कार्यालयात शांतता समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत गणेशोत्सवादरम्यान डीजेच्या वापरास पूर्णपणे बंदी असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा ठाणेदार चौधरी यांनी दिला. उपविभागीय पोलीस अधिकारी मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीस गावातील नागरिक, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करताना ठाणेदारांनी मंडळांना शासनाच्या व पोलिसांच्या नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन केले. ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी डीजेऐवजी बँजो व पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. उत्सव काळात शांतता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन करत गणेशोत्सव उत्साहात व सौहार्दाच्या वातावरणात पार पाडण्यासाठी विविध उपाययोजनांवर या वेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

## कोरडा दुष्काळ जाहीर करा

### खा नागेश पाटील आष्टीकर यांची मागणी

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**उमरखेड** : पावसामुळे पिकांचे झालेले प्रचंड नुकसान आणि त्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी हिंगोली लोकसभा मतदारसंघातील हिंगोली, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांतील भागात १०० टक्के सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावा, अशी ठाम मागणी हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी केली.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागातील पर्जन्यमानातील घट, पिकांची सद्यस्थिती आणि आवश्यक



उपाययोजनांसंदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीस मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी, पालकमंत्री व वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित होते. या वेळी बोलताना खासदार आष्टीकर यांनी मतदारसंघातील बिकट परिस्थितीकडे लक्ष वेधले. पावसाअभावी शेतातील पिके करपून गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने प्रभागात कोरडा दुष्काळ जाहीर करून बाधित शेतकऱ्यांना शासकीय मदत, पीक नुकसानभरपाई आणि आवश्यक सवलती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी लावून धरली. शेतकरी बांधवांच्या हक्कासाठी आणि त्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

## पिस्तूल घेऊन फिरणारा तरुण जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक मोहीम

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**यवतमाळ** : जिल्ह्यातील बेकायदेशीर शस्त्रास्त्रांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक मोहीम उघडली आहे. पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तरोडा फाटा येथून एका २३ वर्षीय तरुणाला गावठी बनावटीचे देशी पिस्तूल आणि जिवंत काडतुसासह रंगेहाथ अटक करण्यात आली. आरोपीकडून ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शेख अरबाज शेख रोशन (वय २३, रा. वरूड, ता. पुसद) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

जिल्ह्यात अवैध धंदे व अग्निशस्त्रांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश दिले होते. शनिवारी एलसीबीचे पथक पोफाळी हद्दीत गस्तीवर असताना, तरोडा फाट्यावरील एका हॉटेलजवळ संशयित तरुण पिस्तूलासह थांबल्याची बातमी गोपनीय बातमीदाराकडून मिळाली.

पथकाने तात्काळ सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता कमरेला ३० हजार रुपये किमतीचे देशी पिस्तूल व १ हजार रुपयांचे जिवंत काडतूस मिळून आले. पोलिसांनी मुद्देमाल जप्त करत आरोपीविरुद्ध पोफाळी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३, २५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय अधिकारी गौरव कायंदे पाटील व एलसीबी प्रमुख सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धीरज बांडे, पोउपनि अमोल राठोड, सुरेश शिंदे व सहकाऱ्यांनी केली.

## महात्मा ज्योतिबा फुले महसूल लोक अदालत अभियान

### प्रलंबित दावे तडजोडीने निकाली काढण्याची संधी

### अदालतीचे वेळापत्रक

■ मंडळ अधिकारी स्तर : ७ व ८ ऑक्टोबर २०२६ (संबंधित मंडळ अधिकारी कार्यालयात)
तहसीलदार व नायब तहसीलदार स्तर : ५ ऑक्टोबर २०२६ (तहसील कार्यालय, झरीजामणी)
उपविभागीय अधिकारी स्तर : उपविभागीय अधिकारी कार्यालय, केळापूर

### ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

■ या अभियानात सहभागासाठी नागरिकांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत आपले दावे संबंधित कार्यालयांत दाखल करता येणार आहेत. झरी, शिबला, माथार्जुन, खडकडोह, मुकुटबन येथील मंडळ अधिकारी कार्यालये तसेच झरीजामणी तहसील आणि केळापूर उपविभागीय कार्यालयात हे अर्ज स्वीकारले जातील. तालुक्यातील नागरिकांनी या संधीचा फायदा घेऊन महसुली प्रकरणांचा कायमस्वरूपी निपटारा करून घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**झरीजामणी** : तालुक्यातील नागरिकांचे महसूलविषयक प्रलंबित दावे व अपील परस्पर सामंजस्याने आणि जलद गतीने निकाली काढण्यासाठी 'महात्मा ज्योतिबा फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या धर्तीवर होणाऱ्या या अभियानाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अक्षय रासने यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत जमिनीशी संबंधित महसुली वाद, दावे व अपील दोन्ही पक्षकारांच्या संमतीने व तडजोडीने कायदेशीर चौकटीत निकाली काढले जाणार आहेत. यासाठी मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उप विभागीय अधिकारी स्तरावर विशेष लोक अदालतींचे आयोजन करण्यात आले आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# शेतपिकाची नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## थेट शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी; वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्याचे निर्देश

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**अमरावती :** गेल्या महिन्याभरात जिल्ह्यात पावसाचा खंड पडल्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर या पिकांच्या परिस्थिती सुधारली नाही. परिणामी उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री बावनकुळे यांनी आज तिवसा तालुक्यातील किशोर पिंपळे, राजू बहाद्दरपुरे यांच्या शेतामध्ये जाऊन प्रत्यक्ष नुकसान झालेल्या पिकाची पाहणी केली. यावेळी आमदार प्रवीण पोटे, प्रताप अडसड, राजेश वानखेडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, गेल्या महिनाभराहून अधिक कालावधीत पावसाचा खंड पडला आहे. यामुळे प्रामुख्याने सोयाबीन पिकावर परिणाम झाला आहे. पावसाअभावी सोयाबीन दाणे परिपक्व अवस्थेत आलेले नसल्याने उत्पादनावर परिणाम होणार आहे. परिणामी शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होईल. यासाठी उपाययोजना म्हणून तातडीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर करून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याचा आग्रह राहील. ही पिक पाहणी करीत असताना संपर्काची समस्या आल्यास त्या ठिकाणचे पंचनामे ऑफलाइन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

सध्यास्थितीत कापूस, तूर आणि संत्रा पिकांना सिंचनाची व्यवस्था झाल्यास ही पिके काही दिवस तग धरू शकतील अशा अवस्थेत आहे. मात्र काही भागात कृषीपंपाचा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सिंचनाबाबत अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या. याबाबत श्री. बावनकुळे यांनी शेताच्या बांधावरूनच सचिव लोकेशचंद्र यांना दूरध्वनीवरून संपर्क करून याबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. तसेच नादुरुस्त असलेले सोलार कृषीपंपाच्या कंत्राटदारांना दोन दिवसात बोलावून दुरुस्त करण्याचे सांगण्यात आले. पिकांची अवस्था ठीक नसल्याने अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गेल्या वर्षीही 1140 कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येत आहे. शेतकऱ्यांबाबत शासन संवेदनशील असून पिकांचे पंचनामे आणि शेतकऱ्यांना आवश्यक गरज असलेल्या सवलती देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

# मला देशासाठी काहीतरी करायचंय - अभिजीत दिपके

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**अमरावती :** राज्यात विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न आहेत, मला आपल्या देशासाठी काहीतरी करायचे आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमानवार यांचा राजीनामा घेतला नाही, तर आता मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जाईल, असा इशारा कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके यांनी दिला. एमपीएससीच्या कारभारावरून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला रोष आणि त्यांच्या विविध मागण्यांवर दीपके यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांशी शनिवारी अमरावतीत संवाद साधला.

अमरावती शहरातील गाडगेबाबा समाधी मंदिरासमोरील मैदानात १९ सप्टेंबरला सायंकाळी हा संवाद झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी एमपीएससीच्या परीक्षा, आयोगाचा कारभार आणि विविध प्रश्नांबाबतच्या नाराजीचा पाढा दीपके याच्यासमोर वाचला. विद्यार्थ्यांच्या भावना ऐकून घेतल्यानंतर दीपके याने आंदोलनासाठी विद्यार्थ्यांनीच पुढाकार घेण्याचे आवाहन केले. एमपीएससीविरोधातील आंदोलन विद्यार्थ्यांनी स्वतः उभे करावे. आंदोलनाचे नेतृत्वही विद्यार्थ्यांनीच करावे, असे दीपके याने सांगितले. विद्यार्थी ज्या ठिकाणी आंदोलन सुरू करण्यास सांगतील, त्या ठिकाणी आपण त्यांच्यासोबत आंदोलनात सहभागी होऊ. आंदोलन किती दिवस चालवायचे, हे विद्यार्थी ठरवतील; मात्र तोपर्यंत आपण त्यांच्यासोबत राहू, असा विश्वास त्याने विद्यार्थ्यांना दिला. अमरावतीतील स्पर्धा परीक्षार्थींशी झालेल्या या संवादामुळे एमपीएससीच्या प्रश्नावर विद्यार्थी आंदोलनाला नवे वळण मिळाले आहे. आगामी काळात विद्यार्थ्यांची भूमिका आणि आंदोलनाची दिशा काय राहते, याकडे लक्ष लागले आहे.

पश्चिम विदर्भातील एक अग्रगण्य सायंदैनिक सिटी न्यूज सुपरफास्टने अल्पावधीत मोठी झेप घेतली आहे. आता मुंबई आवृत्तीही वाचकांसाठी उपलब्ध झाली आहे. सर्वंकष आणि निष्पक्ष बातम्यांसाठी हे सायंदैनिक प्रसिद्ध आहे. सिटी न्यूज सुपरफास्टचे अवलोकन करताना धामणगावचे आमदार प्रताप अडसड.





## आमदार रवी राणा यांनी केली पीक परिस्थितीची पाहणी

आमदार रवी राणा यांनी शेतात जाऊन तूर, कापूस आणि सोयाबीन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पिके जोमात असली, तरी आता त्यांना जगवण्यासाठी पावसाची नितांत गरज आहे. असे एवढी ते म्हणाले. माझा शेतकरी,शेतमजूर राजा हा सुखी समृद्धी व्हावा यासाठी गणपती बाप्पा,महालक्ष्मी माता, व वरुणराजाकडे कळकळीची प्रार्थना करतो की लवकरच जोरदार पाऊस यावा आणि संकटात सापडलेला माझ्या शेतकरी-शेतमजूरांना दिलासा मिळावा हीच प्रार्थना आमदार रवी राणा यांनी केली.

# महानुभाव साहित्याचे जतन करणे सर्व मराठी भाषिकांचे कर्तव्य

## उद्घाटक डॉ महेंद्र ढोरे तिसरे महानुभाव साहित्य संमेलन

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**अमरावती :** महानुभाव साहित्यातून आम्हाला मूल्यात्मक शिकवण व नैतिक आचरण मिळत राहते.महानुभाव साहित्याचे चांगल्या रीतीने जतन करणे सर्व मराठी भाषिकांची सामूहिक जबाबदारी आहे असे उद्बोधन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटक डॉ . महेंद्र ढोरे प्र. कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी केले.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्ष विदर्भ साहित्य संघ नागपूर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून , डॉ. महंत सोनपेठकर समन्वयक महानुभाव अध्यासन केंद्र,डॉ अविनाश आवलगावकर कुलगुरू मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर तालुका मोर्शी, डॉ आराधना वैद्य अध्यक्ष भारतीय विद्या मंदिर अमरावती ,न्यायमूर्ती डॉ.कीर्ती कुलकर्णी, डॉ.भैय्यासाहेब मेटकर, सुभाष पावडे, डॉ संतोष आगरकर सत्कारमूर्ती हर्षी कर बाबा शेवलीकर, विजयराज पंजाबी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी सकाळी महानुभाव पंथीय साहित्य ग्रंथदिंडी श्रीकृष्ण मंदिरापासून परशुराम पॅलेस या संमेलन स्थळापर्यंत काढण्यात आली. यात भारतीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व महानुभाव पंथीय तसेच साहित्य प्रेमी मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

साहित्य संमेलनाचे स्वागत पर प्रस्तावित डॉ.संतोष आगरकर प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी यांनी केले. याप्रसंगी डॉ.अविनाश आवलगावकर, डॉ. आराधना वैद्य न्यायमूर्ती कीर्ती कुलकर्णी यांनी समयोचीत मार्गदर्शन केले.

यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ गिरीश गांधी यांनी आजचा माणूस द्वीप्रतिमेत जगत असल्यामुळे साहित्यातून समाज निर्मिती होत नसल्याची खंत व्यक्त केली. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले दुपारच्या सत्रात महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी गोपीराज बाबा शास्त्री होते तर डॉ.भारतभूषणशास्त्री जामोदेकर, डॉ अण्णा वैद्य प्रा चक्रधर कोठी यांनी विचार व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉअर्चना शिरस्कार यांनी केले.

यावेळी कवि समेलनाने या साहित्य संमेलनाची रंगत आणली. संमेलनाचे आयोजन भारतीय महाविद्यालय मोर्शी, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती मोर्शी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, विदर्भ साहित्य संघ रिद्धपुर,महानुभाव अध्यासन केंद्र अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून पत्रकारांना संधी द्या

## अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**चांदूर रेल्वे :** ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर किंवा प्रशासक नियुक्त करण्याची वेळ आल्यास, ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न आणि जनहिताच्या समस्यांची सखोल जाण असणाऱ्या पात्र व अनुभवी स्थानिक पत्रकारांची 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात चांदूर रेल्वेचे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.ग्रामीण भागातील पत्रकार हा गावातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांसह शासनाच्या विविध योजनांची प्रत्यक्ष माहिती ठेवतो. तसेच जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहचवून ते सोडवण्यात नेहमी अग्रभागी असतो. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहून पत्रकारांना प्रशासक म्हणून संधी द्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक पात्रता, अनुभव व निकष निश्चित करून शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती संघाकडून करण्यात आली. निवेदन सादर करताना संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, प्रा.रवींद्र मेंढे, बाळासाहेब सोरगीवकर, उत्तमराव गावंडे, प्रभाकर भगोले, निशिकांत देशमुख, विवेक राऊत, अमोल गवळी, शहजाद खान, राजीव शिवणकर, रितेश मुंधडा, राजेश सराफी, संजय डगवार, पियुष ठोंबरे, प्रकाश रंगारी, इरफान पठाण, अमर घटारे, राहुल देशमुख, अमोल ठाकरे, सुमेद सरदार, प्रशांत सिसोदिया, मनिष खुने, धीरज नेवारे, रवि कलाने, बंडू गावंडे ,विनय गोटेफोडे,खुशी रायकवार यांच्यासह पत्रकार संघाचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी परिस्थितीला मर्यादा न मानता ध्येय निश्चित करावे!

प्रतिनिधी २० सप्टेंबर

## हेमकृष्ण पिसदे यांचा यशमंत्र, स्पर्धा परीक्षार्थींना केले मार्गदर्शन

### जिद्द, सातत्य आणि ध्येयाचा प्रवास

हेमकृष्ण पिसदे यांचा प्रवास हा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये पदवीचे शिक्षण घेत असतानाच त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय निश्चित केले आणि स्पर्धा परीक्षेच्या खडतर प्रवासाला सुरुवात केली. एक यश मिळाल्यानंतर थांबण्याऐवजी त्यांनी आपले ध्येय अधिक उंचावत नेले. अभ्यासातील सातत्य कायम ठेवत त्यांनी २०२५ च्या राज्यसेवा परीक्षेत तहसीलदार पदावर यश संपादन केले. सध्या ते धामणगाव रेल्वे येथे परिविक्षाधीन तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. नियोजनबद्ध अभ्यास, वेळेचे व्यवस्थापन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि ध्येयाप्रती असलेल्या जिद्दीच्या जोरावर त्यांनी यूपीएससी एआयआर २०२५ मध्ये संपूर्ण भारतातून रँक ८४९ मिळवला. त्यातून त्यांची भारतीय महसूल सेवा मध्ये निवड झाली.

**दर्यापूर :** ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला मर्यादा न मानता मोठे ध्येय निश्चित करून नियोजनबद्ध अभ्यास, सातत्य आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर प्रशासकीय सेवेत यश संपादन करावे, असा प्रेरणादायी संदेश यूपीएससी एआयआर २०२५ मध्ये ऑल इंडिया रँक ८४९ मिळवून भारतीय महसूल सेवामध्ये निवड झालेले हेमकृष्ण प्रेमलाल पिसदे यांनी दिला.

बहुजन राष्ट्र निर्माण प्रशासकीय अकादमी, दर्यापूर यांच्या वतीने १९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सत्कार व भव्य मार्गदर्शन सोहळ्यात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गजाननराव कोरे, संस्थापक, बहुजन राष्ट्र निर्माण प्रशासकीय अकादमी, दर्यापूर हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून हेमकृष्ण पिसदे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अभय गावंडे, परेश धर्माळे आणि रेहान मोहम्मद यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना पिसदे सरांनी एमपीएससी व यूपीएससीची एकत्रित तयारी कशी करावी, अभ्यासाचे योग्य नियोजन कसे करावे, वेळेचे व्यवस्थापन कसे करावे, अभ्यासक्रमाचे विश्लेषण कसे करावे आणि मुलाखतीला आत्मविश्वासाने कसे सामोरे जावे, याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. गजाननराव कोरे यांनी ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी योग्य मार्गदर्शन, अभ्यासाचे वातावरण प्रेरणा मिळावी, या उद्देशाने बहुजन राष्ट्र निर्माण प्रशासकीय अकादमी, दर्यापूरच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# खा. अनिल बोंडे यांच्या निवासस्थानी महालक्ष्मीचे खा. बळवंत वानखडे यांनी घेतले दर्शन



प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अमरावती :** राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांच्या निवासस्थानी माजी महिला व बालकल्याण मंत्री एडवोकेट यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांची भेट -महालक्ष्मी देवी मातेचे घेतले दर्शन , विरोधक असतानाही राजकारणापलीकडची भेट. राज्यसभा खासदार डॉक्टर अनिल बोंडे यांच्या निवासस्थानी माजी महिला व बालकल्याण मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे माजी पालकमंत्री एडवोकेट यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांनी भेट घेतली. यावेळी राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या महालक्ष्मी माता देवीचे त्यांनी दर्शनही त्यांनी घेतले.

खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर विरोधी पक्षात असतानाही राजकारणापलीकडची ही भेट मानल्या जात आहे. यावेळी डॉक्टर वसुधाताई बोंडे , संगीता ताई शिंदे (बोंडे ) यांचीही उपस्थिती होती.

# रेवसा गावात 'लोकसंवाद' पथनाट्यातून सावकारीविरोधात जनजागृती

## कर्जमुक्ती योजनेसह कृषी विभागाच्या योजनांचाही संदेश

प्रतिनिधी २० सप्टेंबर



**अमरावती :** कमी पाऊस, नापिकी आदी समस्यांमुळे सावकारांकडून कर्ज काढत शेती व संसाराचा गाडा हाकणारा शेतकरी हा सावकारी पाशात कसा अडकतो व त्याचा कुटुंब व समाजावर होणारा विपरीत परिणाम चफकलपणे मांडून जिल्हा उप निबंधक कार्यालयाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी रेवसा येथील शिवतांडव गणेशोत्सव मंडळात आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात गावकऱ्यांचे प्रबोधन केले.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना',या योजनेचा गावकऱ्यांनी घेतलेला लाभ,त्यांना येत असलेल्या अडचणी आदींबाबत त्यांच्या मनातील भावना जाणून घेण्यात आल्या. अडचणींच्या सोडवणुकीसाठी उपलब्ध कार्यालये, यंत्रणा व संकेतस्थळ, पोर्टल आदींची माहिती देण्यात आली.

तत्पूर्वी, जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांनी सेवासंकल्प मोहिमे अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद' कार्यक्रमाची माहिती उपस्थित गावकऱ्यांना दिली.

यानंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सहाय्यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निबंधक अनिरुद्ध राऊत आणि छाया देशमुख व अन्य कर्मचारी अशा एकूण १५ जणांच्या चमूने 'सावकारी पाश' हे पथनाट्य सादर केले. सादरीकरणानंतर प्रत्यक्ष जनतेशी संवाद साधून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम,२०१४ हा महाराष्ट्रातील गरिबांचे, शेतकऱ्यांचे आणि सर्वसामान्यांचे बेकायदेशीर व अनिर्बंध सावकारीच्या जाचातून व आर्थिक शोषणातून संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या महत्त्वाच्या कायद्याविषयी माहिती देण्यात आली.

कृषी विभागाच्या वतीने रेवसा येथील सहाय्यक कृषी अधिकारी छाया देशमुख यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, मागेल त्याला शेततळे,नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना,राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान व फलोत्पादन विकास आदींबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.

रेवसा गावच्या पोलीस पाटील छाया वानखडे यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले व 'लोकसंवाद' उपक्रमाच्या माध्यमातून जनतेला देण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माहितीबद्दल समाधान व्यक्त केले.शिव तांडव गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वानखडे,मंडळाचे पदाधिकारी, महिला,पुरुष व तरुण-तरुणी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. २० सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# पिकाचे नुकसान झाले सिध्द, भरीव मदत देण्यासाठी शासन कटिबध्द !

## *कृषीमंत्री दत्तात्रय भरणे *दुष्काळसदृश्य परिस्थितीची बांधावरून पाहणी; शेतकऱ्यांशी साधला संवाद

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले असून, पावसात पडलेल्या खंडामुळे शेती पिकांवर परिणाम झाला आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई व मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. पीक विम्याचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक, अचूकपणे आणि तातडीने पूर्ण करावेत. या प्रक्रियेत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश राज्याचे कृषीमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.





यावेळी आमदार श्याम खोडे, आमदार अमित झनक, आमदार सईताई डाहाके, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनय आवटे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, वाशिम उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, कृषी सहसंचालक घोरपडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह आदींची प्रमुख उपस्थिती होती. मालेगाव तालुक्यातील झोडगा बु., वाशिम तालुक्यातील सूपखेला, मंगरूळपीर तालुक्यातील वरूड बु. आणि कारंजा तालुक्यातील खेर्डा बु. येथे दुष्काळसदृश्य परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पालकमंत्री भरणे यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांकडून पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंडामुळे निर्माण झालेल्या अडचणी तसेच आवश्यक मदतीबाबत माहिती जाणून घेतली. ना.भरणे बोलतांना म्हणाले, सहाही तालुक्यांमध्ये कमी पाऊस व पावसातील खंडामुळे पीक नुकसान आणि टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक उपाययोजना कराव्यात. शेतकरी अडचणीत असल्याने त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागावे, त्यांच्या अडचणी आणि म्हणणे समजून घ्यावे. शासन शेतकऱ्यांच्या सेवेसाठी असून, त्यांना आर्थिक पाठबळ देणे ही शासनाची जबाबदारी आहे, असे कृषी मंत्री तथा पालकमंत्री ना.भरणे यांनी सांगितले. संकटाच्या काळात शासन शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. त्यामुळे शेतकऱ्यांनी संयम बाळगावा, असेही पालकमंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. दुष्काळी गावांच्या यादीबाबत खोटी माहिती व अफवा पसरविणाऱ्या बातम्यांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले. पीक विमा संरक्षणाबाबतची बाब तातडीने केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, प्रशासनातील सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे. लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांची नोंद घेऊन त्यावर आवश्यक ती अंमलबजावणी करावी. शेतकऱ्यांबाबत शासन संवेदनशील असून, त्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी पत्रकार, नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात

### संदीप काळे यांची भाजपा जिल्हा चिटणीस पदी नियुक्ती

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

राजकारणात पद मिळविणे सोपे असते मात्र पदापेक्षा पक्षाचा विचार आणि संघटनेचे काम महत्त्वाचे मानून सातत्याने कार्यरत राहणे ही खरी कार्यकर्त्याची ओळख असते. संदिप काळे यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सामाजिक वाटचालीत हीच भूमिका जपली आहे. तळागाळातील सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. बूथ अध्यक्ष, शहर सरचिटणीस, वाशिम-मंगरूळपीर विधानसभा



मतदारसंघाचे विस्तारक, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. पक्षाने वेळोवेळी सोपविलेल्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या स्वीकारून त्यांनी पक्षविस्तारासाठी सातत्याने प्रयत्न केले. संघटन उभारणी करताना केवळ पदाधिकाऱ्यांपुरते मर्यादित न राहता सामान्य कार्यकर्ता, युवा वर्ग आणि नागरिकांशी थेट संपर्क ठेवण्याची त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे, कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवणे आणि दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण करणे यामुळे पक्ष संघटनेत त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. 'पद हे कामाची ओळख नसून, कामातून पदाला प्रतिष्ठा मिळते' या भूमिकेतून काम करणारे संदिप काळे यांचा प्रवास हा अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी संघटनात्मक शिस्त, पक्षनिष्ठा आणि सातत्य यांना नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने आता त्यांच्यावर भाजपा जिल्हा सचिव म्हणून महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या निवडीसाठी त्यांनी महा.प्रदेश महामंत्री आ.डॉ. संजुभाऊ कुटे, जिल्हाध्यक्ष पुरषोत्तमभाऊ चितलांगे, जिल्हा प्रभारी आ.रंधिरभाऊ सावरकर, डॉ.उपेंद्रजी कोठेकर, आ.श्यामभाऊ खोडे, प्रा.दिनेशजी सूर्यवंशी, आ.सईताई डहाके, माजीआ. विजूभाऊ जाधव, राजु पाटील राजे, मा.नरेंद्रजी गोलेच्छा, मा.सुरेशभाऊ लूंगे यांच्या मार्गदर्शनात पार्टी चे काम अधिक बळकट करून बुथ सक्षम करण्यास त्यांचा उद्देश आहे.

## गणेश मंडळांसमोर पथनाट्यातून कायद्याचा जागर

### पोक्सो, बालविवाह प्रतिबंधक कायदा अन् लोकअदालतीची जनजागृती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गणेशोत्सवाच्या उत्साहात कायद्याची जनजागृती करण्याचा उपक्रम वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने हाती घेतला आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या कॉमन मिनिमम प्रोग्रामअंतर्गत विविध गणेशोत्सव मंडळांसमोर पथनाट्य सादर करून पोक्सो कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि आगामी १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोकअदालतीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली जात आहे. या पथनाट्यांना गणेश मंडळ परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कायद्याची माहिती पुस्तकी



स्वरूपात देण्याऐवजी मनोरंजनातून ती नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी पोक्सो कायद्यातील तरतुदी, बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व तसेच लोकअदालतीच्या माध्यमातून वाद सामोपचाराने निकाली काढण्याची प्रक्रिया याबाबत पथनाट्यातून प्रभावीपणे संदेश दिला जात आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अनिल सुब्रमण्यम आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विठ्ठल चौखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पथनाट्यात विधी स्वयंसेवक सुशील भिमजियाणी, राजकुमार पडघाण, शाहीर उत्तम ओंकार इंगोले, मोतीराम खडसे, माधव डोंगरदिवे, प्रभू कांबळे, शीतल बन्सोड, संध्या सभादिंडे आणि माधव कोंडुजी गायकवाड यांनी भूमिका साकारल्या आहेत. 'जागर पोक्सो कायद्याचा' हे पथनाट्य उपमुख्य लोक अभिरक्षक ॲड. राजेश विसपुते यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे.

बालविवाह प्रतिबंध आणि लोकअदालतीवर आधारित पथनाट्य निवृत्ती सरकटे यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे. विविध गणेशोत्सव मंडळांच्या परिसरात सादर होत असलेल्या या पथनाट्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले जात असून, कायद्याची माहिती सहज आणि प्रभावी पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

## रोजगार महाकुंभासाठी व्यापारी व औद्योगिक क्षेत्राचा सहभाग वाढविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' अंतर्गत जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी व्यापारी व औद्योगिक क्षेत्राचा सक्रिय सहभाग वाढवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

या अनुषंगाने आज जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील व्यापारी संघटनांचे पदाधिकारी तसेच एमआयडीसीच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन २९ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १० ठिकाणी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत हे मेळावे होणार आहेत. या रोजगार मेळाव्यांसाठी जिल्ह्यातील विविध उद्योग, व्यापारी आस्थापना आणि उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपलब्ध रिक्त पदांची माहिती सादर करावी, असे निर्देशही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. स्थानिक उद्योग व व्यापारी आस्थापनांमधील उपलब्ध रोजगाराच्या संधी अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचविणे, आवश्यक मनुष्यबळाची मागणी संकलित करणे आणि रोजगारदाते व नोकरी इच्छुक उमेदवार यांच्यात प्रभावी समन्वय साधणे याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

## अश्लील व्हिडिओच्या क्युआर कोड गणेश मंडळाच्या पायथ्याशी व मंदिरावर लावणाऱ्या तिघांना अटक

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अश्लील व्हिडीओच्या टेलिग्राम ग्रुपचा क्यूआर कोड गणेश मंडळाच्या स्टेजवर आणि मंदिरावर लावणाऱ्या तीन तरुणांना वाशिम शहर पोलिसानी अटक केली. क्यू आर कोड लावतांनाची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.

वाशिम शहरामध्ये अश्लील व्हिडिओच्या टेलिग्राम ग्रुपचा क्यूआर कोड गणपती मंडळाच्या स्टेजवर आणि हनुमान मंदिरावर लावल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चिकटलेले क्यूआर कोड ताब्यात घेतले. दरम्यान परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, त्यामध्ये तीन तरुण संशयितरित्या स्टिकर लावताना दिसून आले. या सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी तपास चक्रे वेगाने फिरवत तन्मय मुठाळ, युगंधर




अफूने आणि सुमित भोने यांना ताब्यात घेत चौकशी केली असता, गर्दीच्या ठिकाणी क्युआर कोड लावून पैसे कमावण्याच्या उद्देशाने क्युआर कोड लावल्याचे त्यांनी कबुली दिली. याप्रकरणी तिन्ही आरोपीविरुद्ध वाशिम शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास वाशिम शहर पोलीस करीत आहे.

## पथनाट्यातून शहरवासीयांना स्वच्छतेचा संदेश

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

वे स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी मंगरूळपीर नगरपरिषदेच्या वतीने पथनाट्याच्या माध्यमातून तउपक्रमातून घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करून तो घंटा गाडीतच टाकावा, तसेच रस्त्यावर, तनाल्यांमध्ये अथवा सार्वजनिक ठिकाणी हे कचरा टाकू नये, असे आवाहन करण्यात आले.

शहरातील व्यापारी, हॉटेल व्यावसायिक, पानटपरीधारक ळ तसेच सर्व नागरिकांनी आपला कचरा



नगरपरिषदेच्या घंटागाडीत द्यावा, असे हे आवाहन करण्यात आले. स्वच्छता - राखल्यास शहरातील रस्ते व परिसर स्वच्छ राहण्यासोबतच नागरिकांचे आरोग्यही सुरक्षित राहण्यास मदत होईल, असा संदेश पथनाट्यातून देण्यात आला. नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती अनिल गावंडे यांच्या पुढाकारातून शहरात स्वच्छता, त औषध फवारणी आणि नागरिकांमध्ये व जनजागृती करण्यावर भर दिला जात आहे. 'स्वच्छ मंगरूळपीर, सुंदर न मंगरूळपीर' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बीनागरिकांचे सहकार्य आवश्यक त असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

त नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी . केवळ नगर परिषदेची न समजता आपले बी घर, गल्ली, परिसर आणि शहर स्वच्छ ५. ठेवण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## गिरधारीलाल सारडा यांच्या अमृत महोत्सवा निमित्त...




# विविध उपक्रम, अन् कार्यक्रम !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सामाजहित, संस्कृती, आणि अध्यात्मिक मूल्याचा वारसा जपत आयुष्यभर लोकसेवेचे कार्य करून समाजसेवा उद्योजकता व लोकहिताच्या कार्यातून गरजूंच्या अडीअडचणी मध्ये त्यांना मदत करून परिसरामध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ समाजसेवक कर्मयोगी श्री गिरधारीलाल रामेश्वरजी सारडा यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अमृत महोत्सव समारंभ मंगळवार दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी जय गजानन कृषी बाजार पंचाळा फाटा हिंगोली रोड वाशिम येथे उत्सवात आयोजित करण्यात आला आहे. आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून मोफत या मंगल प्रसंगी विविध सामाजिक आरोग्य विषयक व लोककल्याणकारी उपक्रमांसह स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सारडा परिवाराने केले आहे या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त भास्कर पाटील पेरे यांची विशेष उपस्थिती आपल्याला लाभणार असून त्यांचे मोलाचे मार्गदर्शन आपल्याला सकाळी ११ वाजता ऐकायला मिळणार आहे. या अमृत महोत्सवाला जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील लोकप्रतिनिधींची उपस्थिती लाभणार आहे यामध्ये केंद्रीय राज्यमंत्री प्रतापरावजी जाधव साहेब संजय जी राठोड मृद व जलसंधारण मंत्री महाराष्ट्र राज्य खासदार संजय देशमुख माजी खासदार नवनीत राणा


सिटी न्यूज सुपरफास्ट

शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

वाशीममध्ये १८ व १९ सप्टेंबरला मोफत हृदयरोग तपासणी शिबिर

*कार्डियाक अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टीसह विविध तपासण्या

*गिरीधारीलालजी सारडा मित्र मंडळाचा उपक्रम

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

समाजसेवेच्या भावनेतून नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्वपूर्ण उपक्रम राबवित गिरीधारीलालजी सारडा मित्र मंडळाच्या वतीने वाशिम येथे दोन दिवसीय मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १८ व १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळपासून आयोजित करण्यात आले आहे. ज्येष्ठ समाजसेवक गिरीधरलालजी सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त व लाइफ लाईन मल्टीस्पेशालिटी

वाशिम येथे हे शिबिर होणार आहे. छातीत दुखणे किंवा जडपणा जाणवणे, हृदयरोगाचा कौटुंबिक इतिहास असणे, वय ५० वर्षापेक्षा अधिक असणे तसेच उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरात डॉ. सौरभ भूतडा (M.B.B.S., M.D. Medicine) आणि डॉ.रिझवान देशमुख (MD Medicine, DM Cardiology, Interventional Cardiologist) यांची वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. अधिक माहितीसाठी

आमदार श्याम खोडे आमदार सईताई डहाके आमदार भावनाताई गवळी आमदार अमित झनक आमदार किरणराव सरनाईक आमदार संजय कुटे भाजपा महाराष्ट्र सरचिटणीस डॉ.उपेंद्र जी कोठेकर भाजपा नेते राजू पाटील राजे आमदार संतोष बांगर भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे नगराध्यक्ष अनिल केंदळे नगराध्यक्ष अशोक परळीकर नगराध्यक्ष भगवानराव शिरसागर भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा माजी मंत्री अनंतरावजी देशमुख माजी मंत्री सुभाषरावजी ठाकरे माजी आमदार एडवोकेट विजयराव जी जाधव माजी आमदार लखन मलिक माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू युवा नेते ?ड ग्यानक पाटणी प्रा.दिलीप जोशी माज़ी अध्यक्ष जि.प.चंद्रकांत ठाकरे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा शहराध्यक्ष मनीष मंत्री माजी जिल्हाप्रमुख सुरेश मापारी माजी सभापती सुरेश लुंगे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हाध्यक्ष सभापती महादेवराव काकडे माजी सभापती माजी जिल्हा परिषद सदस्य नगरसेवक व सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम सोहळा संपन्न होणार असून या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने २२ सप्टेंबर रोजी मोफत विविध शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये हृदयरोग तपासणी शिबिर अस्थिरोग तपासणी शिबिर रक्तदान शिबिर मोफत नेत्र तपासणी शिबिर त्वचारोग शिबिर आयोजित करण्यात आले असून या सर्व सेवांचा लाभ परिसरातील गरजूंनी घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अमृत महोत्सव हा केवळ वाढदिवस सोहळा नसून समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा लोककल्याणाचा उत्सव असल्याची भावना कर्मयोगी गिरधारीलाल सारडा यांनी व्यक्त केली

## संत सावता माळी गणेश मंडळाच्या आरोग्य शिबिर

### २०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला लाभ

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

दरवर्षीप्रमाणे यंदाही रिसोड येथील संत सावता माळी गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून २०० हून अधिक लाभार्थ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. हे आरोग्य शिबिर श्री संत सावता माळी व्यायामशाळा, शिव हिंदू व्यायामशाळा, महात्मा फुले व्यायामशाळा तसेच गंगोत्री वृद्धाश्रम, केलसुला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शिबिरासाठी डॉ. पवार, डॉ. शेख व त्यांच्या वैद्यकीय टीमने विशेष सहकार्य



केले. सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतल्याबद्दल आयोजकांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. यावेळी मंडळाचे सदस्य अरुण मगर, सुभाष इरतकर, संतोष मडके, दत्ता मगर, देवा मडके, लक्ष्मण मगर, प्रमोद भांदुर्गे, शिवाजी मगर, सचिन गांजरे, गणेश मगर, रामू देशमुख (मिल्ट्रीमन) यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# सहा दिवसांपासून आमरण उपोषण; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संताप

## बोरी अडगाव पुलाच्या खड्ड्यामुळे झालेल्या अपघातातील मृत्यू प्रकरणी न्यायाची मागणी; उपोषणकर्त्यांच्या मरणाची वाट पाहते का सरकार?

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** : पुलाच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात सोना जगन सोनवणे यांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, या मागणीसाठी पत्रकार सुधीर टिकार, व जगन काशीराम सोनवणे यांचे सुरू असलेल्या आमरण उपोषणाला आज सहावा दिवस उलटला आहे. मात्र, अद्याप प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी किंवा संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन मागण्यांबाबत ठोस आश्वासन दिले नसल्याने परिसरातील



नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा करणे अपेक्षित होते. मात्र, सहा दिवस उलटूनही प्रशासनाकडून ठोस निर्णय अथवा मागण्यांच्या पूर्ततेबाबत कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांकडून करण्यात येत आहे.च्न्यायासाठी एखाद्या कुटुंबाला आमरण उपोषण करावे लागते आणि सहा दिवस प्रशासनाकडून कोणीही दखल घेत नाही, ही गंभीर बाब आहे. उपोषणकर्त्यांच्या मरणाची वाट प्रशासन पाहत आहे का?ज्ञ् असा संतप्त सवाल यावेळी नागरिकांकडून उपस्थित



केला जात आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित कामाची जबाबदारी, सुरक्षा उपाययोजना, अपघातास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीची चौकशी तसेच दोषींवर कारवाई याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, संबंधित ठेकेदाराला राजकीय पाठबळ असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांकडून करण्यात येत असून, मागण्या मान्य करण्यासाठी प्रशासनाकडून दबाव आणला जात असल्याचेही त्यांचे म्हणणे आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.सामाजिक व शासकीय उत्तरदायित्वाच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घ्यावी आणि मागण्यांबाबत स्पष्ट निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

उपोषणाचा सहावा दिवस सुरू असूनही प्रशासनाकडून ठोस पाऊल उचलले जात नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर होण्यापूर्वी संबंधित विभागांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# जानेफळ परिसरात पावसाची 45 दिवसांपासून दडी

## सोयाबीन-कापूस पिके करपली, शेतकरी आर्थिक संकटात....



प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मेहकर** : जानेफळसह परिसरातील शेतकऱ्यांसमोर आता पावसाअभावी मोठे संकट उभे राहिले आहे. गेल्या तब्बल ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, कापूस यासह विविध पिके अक्षरशः करपून गेली आहेत.

काही ठिकाणी पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून,हातातोंडाशी आलेले पीक पावसाअभावी वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. विशेष म्हणजे, मागील आठ दिवसांत परिसरातील काही भागांत दमदार पाऊस झाला. मात्र जानेफळ परिसरावर पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेली पिके आता पाण्याअभावी सुकू लागली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांकडे विहीर, बोअर किंवा इतर सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांच्यासाठी वीजपुरवठा हा महत्त्वाचा आधार आहे. मात्र महावितरणकडून विविध कारणांमुळे वीजपुरवठा खंडित होत असल्याने उपलब्ध सिंचनाचा लाभ घेण्यातही अडथळे निर्माण होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

# समृद्धी महामार्गालगत हॉटेलला आग; तत्परतेने अनर्थ टळला!

## प्राथमिक अंदाज; बेशिस्त वाहनतळामुळे सुरक्षेचा प्रश्न

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**बुलढाणा** : समृद्धी महामार्गाच्या मुंबई मार्गिकेवरील किलोमीटर क्रमांक ३१०.६ जवळ असलेल्या 'रमावी' हॉटेलला शनिवारी दुपारी साडेबारा वाजता आग लागली. महाराष्ट्र सुरक्षा बल आणि त्वरित प्रतिसाद वाहन पथकाने वेळीच धाव घेतल्यामुळे आग आटोक्यात आली. आगीमुळे झालेल्या नुकसानाचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही. हॉटेलमधून धूर आणि ज्वाळा दिसल्यानंतर काही काळ धावपळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, विद्युत जोडणीतील बिघाडामुळे आग लागल्याचा अंदाज आहे; मात्र आगीचे निश्चित कारण तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे. माहिती मिळताच, दुसरबीड येथील आयसी-१२ केंद्रावरील महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षा पर्यवेक्षक गोपाल डहाळके यांनी संबंधित यंत्रणांना कळवून मदतकार्य सुरू केले.

**रस्त्यावरील थांबा ठरू शकतो धोकादायक !**

डोणगाव आणि दुसरबीड परिसरात उपाहारगृहांजवळ महामार्गावर अथवा सेवा रस्त्यावर वाहने थांबविण्याचे प्रकार वाढले आहेत. भरधाव वाहतुकीत उभ्या वाहनामुळे मागून धडक, वाहतूक कोंडी किंवा बचाव पथकाचा मार्ग अडण्याचा धोका असतो. अधिकृत वाहनतळाची व्यवस्था आणि बेशिस्त पार्किंगवर कठोर कारवाई आवश्यक आहे.

# खामगावात रात्री अतिक्रमणांवर कारवाई; मोहिमेवर प्रश्नचिन्ह!

## अतिक्रमणकर्त्यांनी प्रशासनाला विचारला जाब

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** : शहरातील अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रशासनाने सुरू केलेल्या मोहिमेवरून अतिक्रमणकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः शुक्रवारी रात्री करण्यात आलेल्या कारवाईच्या पद्धतीवरून संबंधितांनी प्रश्न उपस्थित केले असून, प्रशासनाने कारवाईबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी होत आहे. शहरातील रस्ते, सार्वजनिक जागा, तसेच शासकीय मालमत्तांतरील अतिक्रमणे हटविण्याच्या उद्देशाने प्रशासनाकडून मोहीम राबविण्यात येत आहे; मात्र कारवाईची वेळ, संबंधितांना देण्यात आलेली पूर्वसूचना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पद्धतीवर काही अतिकमणकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे. शुक्रवारी रात्री पथकाकडून कारवाई करण्यात आल्याने संबंधित व्यावसायिकांची अचानक धावपळ उडाली. या कारवाईबाबत प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी संबंधितांकटन करण्यात येत आहे, कारवाईची प्रक्रिया, निकष स्पष्ट करण्याची मागणी कारवाईपूर्वी पुरेशी सूचना देण्यात आली होती का, तसेच अतिक्रमण हटविताना निश्चित नियम व निकष सर्वांसाठी समानपणे लागू करण्यात आले का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेला विरोध नसून, कारवाई करताना नियमांची अंमलबजावणी पारदर्शकपणे व्हावी, अशी भूमिका काही अतिक्रमणकर्त्यांनी मांडली आहे. त्यामुळे प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया आणि निकष स्पष्ट करावेत, अशी मागणी पुढे आली आहे.

# शेतशिवारातून पाण्याच्या तीन मोटारी लंपास

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**जळगाव जामोद** : तालुक्यातील खेलमाळी, खेल शिवापूर आणि पारसखेल परिसरातील शेतशिवारातून अज्ञात चोरट्यांनी पाण्याच्या तीन मोटारी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या चोरीत शेतकऱ्यांचे सुमारे ४५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

१५ पोलिसांच्या माहितीनुसार, सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपासून १६ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. खेलमाळी येथील शेतकरी विनोद किसन फेंगळे यांच्या कॅनवरील पाच हॉर्सपॉवरची जुनी वापरती मोटार, दीपक वानखडे यांच्या बोअरमधील एक हॉर्सपॉवरची मोटार आणि दादाराव पारवे यांची पाच हॉर्सपॉवरची पाण्यातील मोटार चोरट्यांनी लंपास केली. चोरीस गेलेल्या



तीनही मोटारींची अंदाजे किंमत प्रत्येकी १५ हजार रुपये असून एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. याप्रकरणी विनोद किसन फेंगळे यांच्या फिर्यादीवरून १९ सप्टेंबर रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहितेनुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार इरफान शेख करीत आहेत.

# कॉलेजमधून 20 वर्षांची तरुणी गायब; वडोदा येथील तरुणावर अपहरणाचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**मलकापूर** : येथील कोलते इंजिनिअरिंग कॉलेजमधून एका २० वर्षीय तरुणीला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात वडोदा येथील एका तरुणाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दसरखेड येथील विनोद सोपान एकडे यांची पुतणी दीक्षा राजू एकडे (वय २०) ही १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास कोलते कॉलेजमध्ये गेली होती. सायंकाळ झाली तरी ती घरी परत न आल्याने तिच्या मोबाईलवर संपर्क साधला असता फोन बंद येत होता. तिच्या नातेवाईकांनी कॉलेजमध्ये जाऊन चौकशी केली असता, वडील आजारी आहेत असे सांगून ती दुपारी १ वाजेच्या सुमारास निघून गेल्याचे शिक्षकांनी सांगितले. दरम्यान, दीक्षा हिने तिच्या वडिलांच्या व्हॉट्सअपवर च्मी लग्न केले आहे, मी चांगली आहे आणि तुम्ही टेन्शन घेऊ नका' असा मेसेज पाठवला. त्यानंतर १८ सप्टेंबर रोजी दीक्षाने तिच्या मावशीला फोन करून रडत संवाद साधला आणि फोन बंद केला. नातेवाईकांनी दीक्षाच्या व्हॉट्सअपचा डीपी तपासला असता, त्यावर अक्षय विठ्ठल चिकटे रा.वडोदा, ता.मलकापूर याच्यासोबतचा फोटो स्टेटस म्हणून ठेवल्याचे दिसून आले.

अज्ञात कारणासाठी मुलीचे अपहरण झाल्याचे स्पष्ट झाल्याने विनोद एकडे यांनी मलकापूर शहर पोलिसांत तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अक्षय विठ्ठल चिकटे याच्याविरुध्द बीएनएस कलम १४०(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत शिंदे करत आहेत.

# मुक्ताईनगर रस्त्यावर अवैध तंबाखू उत्पादनांची विक्री करणाऱ्यावर कारवाई; 414 रुपयांचा मुद्देमाल जप्त

**मलकापूर** : येथील उर्दू शाळेसमोर, मुक्ताईनगर रोड परिसरात अवैधपणे सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणार्या एकाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी १८ सप्टेंबर रोजी रात्री कारवाई केली आहे. मुक्ताईनगर रोडवरील उर्दू शाळेसमोर आरोपी सैय्यद हसन सैय्यद रउफ (वय ४४) रा.कुरेश नगर, पारपेठ, मलकापूर हा सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने कायद्याचे उल्लंघन करून अवैध विक्री करत असल्याची माहिती मिळताच, पोलीस कॉन्स्टेबल योगेश तायडे व सहकार्यांनी १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास पंचांसमक्ष तेथे छापा टाकला. या कारवाईत आरोपीकडून ५ रुपये किमतीच्या गुलाब तंबाखूच्या २९ पुड्या १४५ रु., १० रुपये किमतीच्या गाय छाप तंबाखूच्या १७ पुड्या १७० रु. आणि ११ रुपये किमतीचे उंट बिडीचे ९ बंडल ९९ रु. असा एकूण ४१४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल योगेश तायडे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुध्द सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम २००३ च्या कलम ६ व २४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत शिंदे करत आहेत.

# धावत्या एसटीला आग; प्रवाशांची वेळीच सुटका !

## नांदेड-शेगाव बसच्या टायरमधून निघत होता धूर

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** : शहरातील विकमसी चौकात नांदेड-शेगाव मार्गावरील एसटी बसला शनिवारी दुपारी अचानक आग लागल्याने काही काळ खळबळ उडाली. बसच्या टायरमधून धूर निघत असल्याचे चालक व वाहकाच्या निदर्शनास येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता बस थांबवली. त्यानंतर बसमधील प्रवाशांना तातडीने खाली उतरविण्यात आले. चालक-वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

नांदेडहून शेगावच्या दिशेने जाणारी एसटी बस विकमसी चौकातून जात असताना टायरच्या भागातून अचानक धूर निघू लागला. परिस्थितीची गंभीरता लक्षात येताच चालकाने बस रस्त्याच्या कडेला थांबवली. वाहकाच्या मदतीने बसमधील प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. प्रवासी खाली उतरल्यानंतर काही क्षणांतच टायरच्या भागाला आग लागली. आगीने काही वेळातच बसला वेढा घातल्याने परिसरात धुराचे लोट पसरले. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेला कळविण्यात आली. घटनास्थळी नागरिकांचीही गर्दी झाली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. मात्र, बसला आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. टायरमधून धूर निघण्यामागे नेमके काय कारण होते, याचा तपास संबंधित यंत्रणेकडून केला जात आहे. दरम्यान, या घटनेचे संपूर्ण दृश्य सीसी कॅमेऱ्यात कैद झाले असून, बसला आग लागण्यापूर्वीची व त्यानंतरची दृश्ये या घटनेची तीव्रता स्पष्ट करीत आहेत.

# वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांची गरज !

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** रू गणेशोत्सव सुरू असल्याने शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि गणेश मंडळांच्या परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. गणेशमूर्तीचे दर्शन, आरती तसेच विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सायंकाळच्या वेळी शहरातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळही वाढत आहे. त्यामुळे काही प्रमुख मार्गावर वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण वाढले आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक पोलिसांची प्रभावी नियुक्ती करण्याची गरज आहे. विशेषतः प्रमुख चौक, बाजारपेठा, गणेश मंडळांच्या परिसरासह विसर्जन मार्गावर पोलिसांची उपस्थिती वाढविल्यास वाहतूक सुरळीत ठेवण्यास मदत होऊ शकते. गर्दीच्या ठिकाणी वाहने अस्ताव्यस्त उभी राहू नयेत, यासाठीही आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# प्रवाशांच्या जिवाशी खेळ थांबणार; 'स्क्रॅप' झालेल्या रिक्षांवर कारवाई!

## मुदत संपलेल्या व भंगार घोषित रिक्षांचा प्रवासी वाहतुकीसाठी वापर; ५ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** : मुदत संपलेल्या, भंगार घोषित झालेल्या आणि नियमबाह्य पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांविरोधात परिवहन विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अशा रिक्षांची तपासणी करून दोषी वाहनांवर दंडात्मक, तसेच आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ही विशेष मोहीम ५ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत स्क्रॅप झालेल्या किंवा नियमबाह्य रिक्षांचा पुन्हा प्रवासी वाहतुकीसाठी वापर होत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली. बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी अथवा इतर नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावर धावणाऱ्या रिक्षांची तपासणी करण्याचे निर्देश प्रादेशिक परिवहन



कार्यालयांना देण्यात आले आहेत. नियमबाह्य रिक्षांविरोधातील कारवाई अधिक तीव्र होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**स्क्रॅप'चा नियम काय**

वाहन जुने झाले म्हणून ते आपोआप स्क्रैप होत नाही. परिवहन वाहनांसाठी फिटनेस चाचणी महत्त्वाची आहे. निर्धारित निकषांनुसार वाहन फिटनेस चाचणीत अपयशी ठरल्यास ते स्क्रॅपिंगसाठी वाहन स्क्रॅपिंग केंद्राकडे देण्याची प्रक्रिया लागू होते. जुन्या व अयोग्य वाहनांना फिटनेस चाचणीच्या आधारे दूर करण्याची व्यवस्था आहे.

**शिक्षा आणि दंडाची काय तरतूद ?**

दोषयुक्त वाहन सार्वजनिक ठिकाणी चालविणे किंवा तसे करण्यास परवानगी देणे यासाठी मोटार वाहन विभागाच्या दंड अनुसूचीत तीन महिन्यांपर्यंत कारावास किंवा १ हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही अशी कमाल शिक्षा नमूद आहे. वाहनाकडे आवश्यक कागदपत्रे नसणे, विमा नसणे, अनधिकृत फेरफार करणे यासाठीही स्वतंत्र तरतुदी आहेत. विमा नसलेल्या वाहनासाठी चालकाला तीन महिन्यांपर्यंत कारावास किंवा १ हजार रुपये दंड अथवा दोन्ही, तर मालकासाठी दोन हजार रुपयांपर्यंत तडजोड शुल्काची तरतूद आहे.

स्क्रॅप रिक्षांवर आरटीओ कडक कारवाई करणार!

विशेष मोहिमेत स्क्रॅप झालेल्या, मुदत संपलेल्या आणि नियमबाह्य रिक्षांची तपासणी केली जाणार आहे. दोषी आढळलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यासोबतच आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**भंगार रिक्षांतून वाहतूक जोरात, अपघाताचा धोका!**

मुदत संपलेल्या किंवा स्क्रॅप घोषित केलेल्या रिक्षांमध्ये वाहनाची यांत्रिक स्थिती, ब्रेक, टायर, दिवे आदी सुरक्षाविषयक बाबी धोकादायक स्थितीत असण्याची शक्यता असते. अशा वाहनांतून प्रवासी वाहतूक सुरू राहिल्यास अपघाताचा धोका वाढतो. त्यामुळे रस्त्यावर धावणाऱ्या प्रत्येक रिक्षेची नोंदणी, योग्यता प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांची तपासणी महत्त्वाची ठरणार आहे.

# गणेश विसर्जन मिरवणुकीतील मंडळांना पारंपारिक वाद्यांसाठी समान वेळ द्यावा

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**खामगाव** : गणेश विसर्जन मिरवणुकीतील मंडळांचा क्रम, वेळेचे नियोजन, मिरवणुकीचा मार्ग व पारंपारिक वाद्यांसाठी समान वेळ देण्यात यावा, अशी मागणी जय त्रिशुल नवयुवक मंडळाचे अध्यक्ष प्रणय चंद्रशेखर पुरोहित व सचिव सागर वसंतराव बंड यांनी उपविभागीय पोलिस अधिक्षक यांचेकडे १९ सप्टेंबर रोजी निवेदनाव्दारे केली आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या नियोजनासंदर्भात झालेल्या बैठकीत मंडळांच्या क्रमांकाबाबत चर्चा करण्यात आली. दरवर्षी शहरातील सुमारे २५ मंडळांपैकी केवळ १२ ते १३ मंडळांनाच रात्री १२ वाजण्यापूर्वी मिरवणुकीत सहभागी होता येते. त्यानंतर वेळेच्या कारणास्तव पारंपारिक वाद्य वाजविण्यास



मनाई केली जाते. त्यामुळे अनेक मंडळांना मुख्य मिरवणुकीचा उत्साह व कार्यक्रम पूर्णपणे पार पाडता येत नाही. विशेषतः मागील मंडळांचा क्रमांक सातत्याने शेवटच्या क्रमांकामध्ये येत असल्याने मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे सर्व गणेश मंडळांना समान संधी मिळावी व मिरवणुकीचे योग्य नियोजन व्हावे, याकरिता प्रत्येक मंडळासाठी फरशी येथे पोहचण्याची पूर्वनिश्चित वेळ प्रशासनाकडून निश्चित करण्यात यावी, जेणेकरुन मिरवणुकीस विलंब होणार नाही. त्रिशुल चौक, महावीर चौक, अर्जुन जलमंदिर चौक, भुसावळ चौक, केडीया टर्निंग चौक, मस्तान चौक या मुख्य चौकांमध्ये प्रत्येक मंडळाला १५ मिनिटांचा निश्चित वेळ द्यावा, मिरवणुकीचा प्रारंभ फरशी येथून न करता मोहन टॉकीज, त्रिशुल चौक येथून करावा, जेणेकरुन मिरवणूक शिस्तबध्द पध्दतीने नियंत्रित करता येईल. रात्री १२ नंतर पारंपारिक वाद्यांबाबत स्पष्ट व पूर्वनियोजित व्यवस्था करण्यात यावी, मंडळांना आधीच निश्चित वेळ व मार्ग देण्यात आल्यास वेळेचे योग्य नियोजन करता येईल व सर्व मंडळांना समान संधी मिळेल.

# शहरातील गणेश मंडळांमुळे काही रस्ते ब्लॉक!

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला:** सध्या शहरात सर्वत्र गणेशोत्सव जल्लोषात सुरू आहे. बाप्पाच्या आगमनाने सर्वत्र चैतन्य दिसून येत आहे बापाच्या स्थापनेसाठी शहरात मोठे मंडप उभारण्यात आले आहेत परंतु शहरात काही गणेश मंडळांनी रस्त्याच्या मधोमध मंडप उभारल्याने अशा ठिकाणी वाहतुकीला मोठी अडचण निर्माण होत आहे याबाबत नागरिकांमध्ये नाराजी ही व्यक्त होत आहे मनपा आणि पोलीस प्रशासनाने मात्र याकडे साप दुर्लक्ष केल्याने वाहतुकीचा प्रश्न



## वाहतुकीचा प्रश्न अवघड

अवघड झाला आहे ज्या मंडळामुळे वाहतुकीस अडचण होत आहे अशा मार्गावरील वाहनांची वाहतूक तरी दुसरीकडून वळविणे गरजेचे आहे. आधीच शहरातील रस्ते अरुंद असल्याने व रस्त्यावर मंडप उभारल्याने वाहतुकीचा प्रश्न बिकट झाला आहेशहरातील तेलीपुरा, माणिक टॉकीज, शासकीय महिलांचे आयटीआय, दगडी पूल, हरिहर पेठ, वसंत टॉकीज मागील भागातील मंडळानी सुद्धा मोठ मोठे मंडप उभारल्याने रस्ता ब्लॉक झाला आहे. साधी दुचाकी सुद्धा व्यवस्थित जाऊ शकेल अशी जागा सोडली गेली नाही परिणामी सायंकाळी वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे. तसेच परिसरातील रहिवाशांना सुद्धा फिरून जावे लागत आहे.





### काहीजणांनी जागा सोडली परंतु इतरांनी अडवली

» शहरातील काही सुज्ञ गणेश मंडळांनी मात्र रस्त्यावर मंडप उभारताना वाहतुकीला अडचण होणार नाही याचेही भान ठेवले आहे परंतु सायंकाळी या ठिकाणी ऑटो रिक्षा उभ्या राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे

» सण उत्सव समारंभ साजरी करणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे ध्वनी व जल प्रदूषण होणार नाही आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची भान राखणे अत्यंत गरजेचे आहे भूक पशुपक्षी रुग्ण जेष्ठ नागरिक आणि लहान बालके या सर्वांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेऊनच आपण सर्व सण उत्सव साजरे केले पाहिजेत

**एक पक्षी मित्र**

# मोठ्या उमरीतील चोरीच्या घटनांचा तपास रखडला?

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला :** मोठी उमरी परिसरातील लोखंडे लेआउट, जामोदकर लेआउट आणि हनुमाननगर परिसरात चोरी व चोरीच्या प्रयत्नाच्या पाच घटना घडल्याची माहिती समोर आली होती . या घटनांना काही दिवस उलटूनही अद्याप चोरट्यांचा शोध लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. लोखंडे लेआउटमध्ये विजय रमेश जायभाये यांच्या घरात चोरीचा प्रयत्न झाला होता . चोरट्यांनी घरातील कपाट तसेच गादीची तपासणी केली; मात्र त्यांच्या हाती कोणताही मुद्देमाल लागला नव्हता . याशिवाय परिसरातील इतर घरांमध्येही चोरीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे एका निवृत्त पोलिस कर्मचाऱ्याच्या घरालाही चोरट्यांनी लक्ष्य होते . या घटनांना दिवस उलटूनही पोलिसांच्या हाती चोरटे लागलेले नाहीत. तसेच तपासाची सद्यस्थिती, संशयितांची माहिती किंवा पोलिसांना मिळालेले धागेदोरे याबाबतही पोलिसांकडून अद्याप कोणतेही ठोस अपडेट देण्यात आलेले नाही.

# मैत्री बोध परिवारातर्फे विश्वशांती यात्रेचे आयोजन !

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला :** अखिल भारतीय आध्यात्मिक समिती व मैत्री बोध परिवाराच्या वतीने पूज्य मैत्रेय दादाजींच्या मार्गदर्शनाखाली अकोला येथे विश्वशांती यात्रेचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. 'प्रेम, बंधुभाव, सद्भावना, मानवता आणि आत्मपरिवर्तनाचा' संदेश जनमानसांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ही यात्रा काढण्यात आली.

पूज्य मैत्रेय दादाजी हे जागतिक मानवतावादी समाजसुधारक आणि परिवर्तनाचे प्रणेते म्हणून कार्य करत आहेत. मानवामध्ये प्रेम जागृत करून आंतरमनातील परिवर्तन घडवणे, मानवी नात्यांमध्ये प्रेम व मैत्री दृढ करणे आणि 'एक




विश्व, एक परिवार, एक सत्य' या संकल्पनेच्या दिशेने समाजाला प्रेरित करणे हे या कार्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या या विश्वशांती यात्रेत प्रेम, शांतता आणि निःस्वार्थ सेवेचा संदेश देण्यात आला. यामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर, साधक, सेवाभावी कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येत सहभाग घेतला.'प्रत्येक व्यक्तीने आपल्या आचरणतून प्रेम, सद्भावना आणि मानवतेची जम्बूक (जोपासना) करण्याचे आवाहन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले. 'एक विश्व, एक परिवार' या भावनेतून सुरू झालेली ही यात्रा अकोलेकरांसाठी आध्यात्मिक आणि सामाजिक एकतेचा प्रेरणादायी संदेश देणारी ठरली.'

# आधी वंदू तुज मोरया...



विराज वानखडे किवी प्राईम केशव नगर अकोला



त्रिमूर्ती गणेश उत्सव मंडळ, सहकार नगर



अश्विनी जगताप, आनंद नगर, हिंगणा फाटा



लहरी गणेशोत्सव मंडळ वसंत टॉकिज जवळ




रणपिसे नगरात बारा ज्योतिर्लिंग मंदिर नजीक रहिवासी तथा प्रसिद्ध कलावंत राजेंद्र सोनवने यांनी श्री गणेशा समोर पर्यावरण पूरक देखावा सादर केला आहे. पाणी वाचवा तसेच पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला आहे.

# महागणेशोत्सव, गणपती बाप्पाचा भक्तीमय सोहळा

## चला, अनुभवूया संस्कृती, परंपरा आणि कलेचा सुंदर संगम!

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला :** सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महागणेशउत्सव आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार, दिनांक २२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता. राणी महाल पोलीस लॉन, अकोला येथे होणाऱ्या या सांस्कृतिक सोहळ्यात मनोरंजनाची आणि भक्तीची खास मेजवानी असणार आहे.यावेळी श्री गणेशाच्या चरणी गणेश वंदना, डान्स ग्रुपचे मनमोहक नृत्य सादरीकरण होईल.




तसेच बालरूपेज् दिव्य स्वरूपे, लहान मुला-मुलींसाठी खास संत आणि देवांच्या अवतारांची वेशभूषा स्पर्धा, वयोगट ५ ते १२ वर्षे, स्पर्धेसाठी जागा मर्यादित! यानंतर रंगणार आहे. भक्ती आणि भावगीतांची सुरेल मैफिल आणि कलेचा, संस्कृतीचा आणि योगदानाचा गौरव करणारा कृतज्ञतेचा सोहळा, सन्मान आणि बक्षीस वितरण होणार आहे. तर या गणेशोत्सवात फक्त उत्सव साजरा करू नका, आपली संस्कृती जपाज् परंपरा जपा आणि कलेला दाद द्या! संपूर्ण कुटुंबासह महागणेशउत्सवात सहभागी होऊया. गणपती बाप्पा मोरया!

# शहरात एकीकडे अतिक्रमण हटाव मोहीम, दुसरीकडे चौपाटीला मोकळे रान?

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला:** शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमणविरोधी कारवाई सुरू आहे. मात्र, दुसरीकडे शहरातील अतिशय संवेदनशील प्रशासकीय परिसरात सायंकाळ होताच सुरू असलेल्या कथित अनधिकृत चौपाटीच्या कारभारावरून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जिल्हा कारागृह, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि SDPO कार्यालय



यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय संस्थांच्या परिसरात सायंकाळच्या वेळी खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि नागरिकांची गर्दी होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा प्रश्न केवळ अतिक्रमणाचा नसून शासकीय संस्थांची सुरक्षा, वाहतूक व्यवस्था आणि आपत्कालीन सेवांच्या सुरळीत आवागमनाशी संबंधित असल्याचेही बोलले जात आहे. काही काळापूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयाजवळील चहाच्या टपरीमध्ये गॅस सिलेंडर भडकण्याची घटना घडली होती. त्यामुळे संवेदनशील शासकीय परिसराच्या आजूबाजूला सुरू असलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलची सुरक्षा तपासणी नियमितपणे केली जाते का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. आता प्रशासनाने स्पष्ट करावे या चौपाटीला संचालनाची लेखी परवानगी कोणा दिली.

# तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतिपदाची उद्या निवडणूक

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**तेल्हारा:** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदाची निवडणूक २१ सप्टेंबरला होणार असून सभापती कोण होणार याकडे तेल्हारा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्याम घोंगे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव पारित झाल्याने सभापतिपद रिक्त झाले आहे. या रिक्त पदासाठी आता सोमवार २१ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता बाजार समितीच्या मुख्य कार्यालयात निवडणूक होणार असून, बाजार समितीचा नवा सभापती कोण होणार याकडे लक्ष आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीसाठी जिल्हा उपनिबंधक यांनी सहायक निबंध पातूर जे. आर. मलीये, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. २१ सप्टेंबरच्या निवडणुकीत बाजार समितीच्या सभापतिपदाची धुरा कोणाच्या हाती येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. समितीमध्ये संचालकांचे संख्याबळ १८ होते मात्र दोन संचालक अपात्र झाल्याने संख्याबळ १६ झाले आहे त्यामुळे सभापती पदाकरिता नऊ संचालकांचा पाठिंबा असणे गरजेचे आहे.

# 'ऑटोक्रॅट' कोचिंग क्लास आणि कोट्यवधींच्या जागा हडपण्याचा उद्योग

## जावेद जकारीया व त्यांच्या मुलांच्या विरोधात मुर्तझा हुसेन यांचे गंभीर आरोप

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोला:** अकोला शहरात सध्या एका अत्यंत गंभीर, संतापजनक आणि हादरवून सोडणाऱ्या फसवणुकीच्या प्रकरणाने शहरभर प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. दिवंगत प्रख्यात शिक्षक अली सर यांच्या लोकप्रिय 'ऑटोक्रॅट कोचिंग क्लास'चे ब्रँडनेम आणि कोट्यवधी रुपयांची बहुमूल्य जागा हडपल्याचा सनसनाटी दावा त्यांचे चुलत भाऊ मुर्तझा हुसेन कैसर हुसेन यांनी एका पत्रकार परिषदेत केला आहे. विशेष म्हणजे, याप्रकरणी पोलीस प्रशासनात तक्रार देऊनही अधिकारी राजकीय दबावाखाली मूग गिळून बसल्याचा गंभीर



आरोप पीडित व्यावसायिकाने केला आहे. मुर्तझा हुसेन कैसर हुसेन यांनी आपल्या ताब्यातील भक्कम कागदपत्रांच्या आधारे ही पत्रकार परिषद घेत या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. अली सरांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबातील वृद्धांच्या अज्ञानाचा आणि भावनिक स्थितीचा गैरफायदा घेऊन कोट्यवधींची मालमत्ता हडपण्याचे षडयंत्र रचले गेले आहे. सध्या या प्रकरणाची सर्वत्र चर्चा असून, पोलिस प्रशासनाने तात्काळ या प्रकरणात कोणतीही राजकीय भीती किंवा दबावाला बळी न पडता जावेद जकरीया आणि शारीक डोकडीया यांच्याविरोधात कठोर कायदेशीर गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या निमित्ताने देण्यात आला आहे.

**नेमका काय आहे प्रकार ?**

पत्रकार जावेद जकारीया आणि त्यांचा मुलगा शारीक जकारीया (डोकाडिया) यांनी दिवंगत अली सर यांच्या मालकीचा 'ऑटोक्रॅट' हा कोचिंग क्लास केवळ दोन वर्षांच्या करारतत्वावर चालवण्यासाठी घेतला होता. ठरलेला करार संपल्यानंतरही या दोघा बापलेकांनी जागेचे नियमित भाडे देण्याचे तर दूरच, उलट कोचिंग क्लासचे नाव स्वतःच्या नावावर करून कोट्यवधी रुपयांची जागा लाटण्याचा कुत्सित डाव साधल्याचा आरोप आहे. दिवंगत अली सर यांच्या आईच्या मालकीच्या व संपत्ती असलेल्या जागेवर व क्लासच्या नावावर सुनियोजित पद्धतीने ताबा मिळवत ही फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. प्रमुख तक्रार ही शारीक जावेद डोकडीया यांच्या विरोधात असून , त्याचे वडील जावेद डोकडीया (जकरीया) हे स्वतःला 'पोलिस मित्र' म्हणून मिरवतात. एवढेच नव्हे तर ते एका राजकीय पक्षाचे पदाधिकारी असून स्वतःला पत्रकार असल्याचेही भासवतात. याच राजकीय आणि प्रशासकीय वलयाचा गैरवापर करून जावेद जकारीया हे पोलिसांवर अप्रत्यक्ष दबाव आणत असल्याचा दाट संशय मुर्तझा हुसेन यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळेच इतका मोठा गैरप्रकार आणि फसवणूक समोर आलेली असतानाही रामदासपेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी गुन्हा दाखल करण्यासाठी टाळाटाळ करत आहेत का, असा संतप्त सवाल आता अकोलेकरांमधून विचारला जात आहे.

# शिवपुर रोडवरील शेतात बिबट्याने दोन पटावरील गोऱ्ह्यांचा पाडला फडशा

प्रतिनिधी २० सप्टेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यामधील सातपुड्यात वसलेले शिवपुर , शहापूर रूपागड, अकोली जहागीर, अंबोडा परिसरात कुत्र्यांच्या शिकारी, रुईखेड शिवारात काळवीटाच्या बकऱ्या डुकरांच्या शिकारी, वस्तापूर मानकरी बकऱ्या शिकारी पिंपरी खुर्द या सातपुड्यात वसलेल्या गावांमध्ये गेल्या कित्येक दिवसापासून बिबट वन्य प्राण्यांचे होणाऱ्या भर दिवसा हल्ल्यामुळे शेतकरी वर्ग व मजूर वर्ग मोठ्या प्रमाणात भयभीत झाला असून शेतात काम करणे रोडने येरजा करणे हे मोठे अवघडीचे जीव धोक्यात टाकायचे काम त्या नागरिकांना करण्याची वेळ आली आहे शिवपुर मुख्य रोडवर नदीपात्रात गावालगत मुख्य रोडवर असलेल्या गौरक्षांच्या भागात



शेतकरी सुरेंद्र बोंद्रे यांच्या शेतातील दोन पटावरील गोऱ्यांचा बिबट्याने दि.१५ व दि.१६ ला मध्यरात्री फडशा पाडला त्यामध्ये दोन्हीही गोरे एक जाग्यावरच मृत्युमुखी पडले यामध्ये शेतकऱ्याचे एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, पंचनामा करतेवेळी अमोना बी. एम. देवकांबळे, वनपाल पुनम राठोड, सय्यद असलम सह शेतकरी सतीश महल्ले,अमोल महल्ले, राम बोंद्रे, संजय महल्ले, पिंटू राऊत, शुभम महल्ले, संदीप सोलकर, शेखलाल भाऊ, गोपाल नाईक, राजू मोडक असे असंख्य शेतकरी पंचनामा करतेवेळी हजर होते, ,शिवपुर रूपागड गावालगत नंदिनी कृषी समृद्धी गौशाला असून निखिल देशमुख उमरा यांची गाय भर दिवसा चराईला गेली असता दुपारी १.३० वाजताच्या दरम्यान बिबट वन्यप्राण्याने गाईला मोठ्या प्रमाणात जखमी केले काही दिवसात ही गाय पण मृत्युमुखी पडणार आहे असे त्यांनी सांगितले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135